• पंढरपूर • बुधवार, २५ डिसेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २१५



हिशोबात अतिशय ट्रान्सपरन्सी असणारी एकमेव संस्था म्हणजे .... PII



सर्वसामान्य माणसांना विज्ञानाविषयी जनजागृती व्हावी यासाठी 'विज्ञान... PIII

### निवडणूक आयोगाने दिले ६६ पानांचे उत्तर

# काँग्रेसचे सर्व दावे फेल !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर विरोधकांनी ईव्हीएमवर आक्षेप घेत शंका व्यक्त केली होती. या प्रकरणी महाविकास आघाडीच्या पक्षांनी काही ठिकाणी फेरमतमोजणीसाठीही अर्ज केले होते. तर काँग्रेसने राज्यातील ५० जागांवर मतदानाच्या आधी दोन महिने ५० हजार मतदार वाढल्याचा दावा केला होता. काँग्रेसकडून करण्यात आलेल्या तक्रारीला आता निवडणूक आयोगाने उत्तर दिलं आहे. प्रत्येक मतदारसंघाबाबत निवडणूक आयोगाने ६६ पानांची माहिती काँग्रेसला पाठवली. तसेच काँग्रेसकडून करण्यात आलेले दावे फेटाळून लावले आहेत.

» राजकीय

काँग्रेसकडून याआधी ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्याला निवडणूक आयोगाने उत्तर दिले होते. राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितलं होतं की, राज्यात सर्व २८८ मतदारसंघात १४४० व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्या पडताळल्या. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्यांमध्ये कोणताच बदल आढळला नाही.

निवडणूक आयोगाने सांगितले की, राज्यात ५० विधानसभा मतदारसंघात जुलै ते नोव्हेंबर या काळात ५० हजार मतदार वाढवल्याचा काँग्रेसचा दावा तथ्यहीन आहे. असं झालेलं नाही. आम्ही प्रत्येक मतदारसंघाची माहिती पडताळली. जुलै ते नोव्हेंबरपर्यंत ५० हजार मतदार वाढले आहेत, » पान ३ वर

**अनियमितता आढळली नाही**

● काँग्रेसनेही ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित केले होते, या प्रश्नांना निवडणूक आयोगाने उत्तर दिले होते. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले होते की, राज्यातील सर्व २८८ विधानसभा जागांवर १४४० VVPAT स्लिपची मोजणी करण्यात आली आहे. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी स्लिपच्या मोजणीत कोणतीही अनियमितता आढळली नाही. म्हणजे सर्व ईव्हीएम बरोबर होत्या.




**मते कशी वाढली?**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील मतांच्या टक्केवारीतील तफावत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के मतदान झाले. त्याच रात्री ११.३० वाजता ते ६५.०२ टक्के तर दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ नोव्हेंबर रोजी हेच मतदान ६६.०५ टक्के झाल्याचे सांगितले. यात एकूण ७.८३ टक्के वाढ झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. ही वाढ ७६ लाख मतांची असून मतदानाचा टक्का कसा वाढला,' असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उपस्थित केला होता. निवडणूक आयोगाने जिथे मतदान वाढले त्या केंद्राचे व्हिडिओ फुटेज जाहीर करण्याची मागणी केली होती.

## विरोधकांकडून फेक नऱ्हेटिव सेट -ना. सामंत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्रात उद्योगांना कुणी त्रास देत असेल तर त्यावर कारवाई करू. सर्व उद्योगांना संरक्षण देण्याचे आमचं काम आहे. राज्यभर उद्योग भवन उभारण्याचे काम हाती घेणार आहोत. गडचिरोली सारख्या जिल्हयात अनेक कंपन्या आणल्या. मराठवाड्यात देखील अनेक गुंतवणुकी आम्ही आणल्या आहेत. संभाजी नगरध्ये अनेक प्रकल्प आम्ही आणले आहेत. माझ्या मतदार संघात देखील एक मोठा कारखाना येत आहे. त्याचे काम सूरू झालं आहे.

पुणे, गडचिरली, रत्नागिरी, कल्याण डोंबिवली या जिल्ह्याला टाटा समूहाकडून सीआरएसमधून ५०० कोटी रुपयांचे प्रकल्प होत आहेत.असे महाराष्ट्रातील उद्योगाबाबत पुण्यात माध्यमांशी बोलताना उदय सामंत म्हणाले. उद्योग महाराष्ट्राबाहेर जात आहेत. या विरोधकांच्या वक्तव्यावर सामंत यांनी यावेळी निशाणा साधला. ते म्हणाले, विरोधकांनी फेक नऱ्हेटिव सेट केला होता. उद्योग कुठलेच राज्याबाहेर गेले गेले नाहीत. त्यांच्या काळात काम झाल नाही. म्हणुन हे प्रकल्प बाहेर गेले. चर्चा न झाल्याने त्यांच्या काळात एयर बस हा प्रकल्प गेला. याबाबत व्हाईट पेपर का काढला नाही असं सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

» राजकीय

कल्याणमध्ये एका मराठी कुटुंबाला अमराठी माणसाने बेदम मारहाण केल्याचं प्रकरण समोर आल्याने राज्यातील वातावरण तापले आहे. मुंबईत, महाराष्ट्रात राहूनही मराठी माणसांना अतिशय तुच्छ वागणूक देणारे अनेक प्रकार यापूर्वीही घडले असून असाच प्रकार पुन्हा घडल्याने मराठी माणूस महाराष्ट्रातच » पान ३ वर


**» At a Glance**

### वाळूच्या गाडीची टीप दिल्याने युवकास मारहाण



**सांगोला :** तूच पोलिसांना माझ्या वाळूच्या गाडीची टीप दिल्याने तुझ्यामुळे माझ्यावर वाळूची केस दाखल झाली असे म्हणत मनात राग धरून चिडलेल्या चौघांनी मिळून एकास अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करीत मारहाण केली. खिशातील रोख १५ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. शरद अरुण केदार यांनी फिर्यादी असून, पोलिसांनी याप्रकरणी पवन पांडुरंग पवार, अजय विजय पवार, रोहित ऊर्फ पप्पू पांडुरंग पवार व अभय विठ्ठल पवार सर्वजण (रा. कडलास) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### सोलापूरकरांना विमानसेवेसाठी करावी लागणार दोन महिने प्रतीक्षा



**सोलापूर :** सोलापूरकरांना विमानाने प्रवास करण्यासाठी आणखी दोन महिन्यांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. कारण ब्युरो ऑफ सिविलसिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटी तसेच डायरेक्टर जनरल ऑफ सिविलसिव्हिल एव्हिएशन विभागाकडून काही परवाने प्रलंबित राहिल्याने फ्लाय 91 या विमान कंपनीला सोलापूर विमानतळावरून प्रत्यक्ष विमान सेवा सुरू करता येत नसल्याची माहिती विमानतळ प्रशासनाने दिली आहे. यापूर्वी सोमवार 23 डिसेंबर रोजी सोलापूर विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्याचे आश्वासन शासनाकडून मिळाले होते. प्रत्यक्षात मात्र अद्यापही विमानसेवा सुरू झालेली नाही.

### लाखो रुपयांचे आमिष दाखवून महिलेला 30 लाखांना फसवले



**सोलापूर :** रिटेल क्षेत्रात लाखो रुपये मिळतील असे आमिष दाखवून स्टॉकिस्टच्या नावाखाली सोलापुरातील महिलेला 30 लाख रुपयांना फसविल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मनीषा विष्णू मोंढे (वय 51 राहणार अंत्रोळीकर नगर भाग एक, होटगी रोड, सोलापूर) यांनी पोलिसांमध्ये फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सचिन मालीक पाटील राहणार औरंगाबाद याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे हे करीत आहेत.

### तुमचाही संतोष देशमुख होईल, सावंतांच्या पुतण्यांना धमकी



**सोलापूर :** बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाने राज्यात तणावपूर्ण वातावरण कायम आहे. अशातच आता आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. 'तुमचाही संतोष देशमुख केला जाईल' अशी धमकी राज्याचे माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या दोन पुतण्यांना देण्यात आली आहे. धाराशिव जि.प.चे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत व तेरणा कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव सावंत यांना अज्ञाताकडून चिठ्ठीद्वारे ही धमकी देण्यात आली आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा नोंद केला आहे.

## भाजप कोणाच्या नेतृत्वात निवडणूक लढविणार?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोकसभा निवडणुकीत भाजपला राज्यात फटका बसला. त्यानंतर सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र भाजप बहुमताच्या जवळ गेला. पुण्यातील कसब्यासह कोथरूड, पर्वती, शिवाजीनगर, खडकवासला, पुणे कॅन्टोन्मेंट या विधानसभा मतदारसंघांत भाजपचे उमेदवार विजयी झाले.

या निवडणुकीनंतर शहर भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांचा आत्मविश्वासही उंचावला असून, महापालिका निवडणुकीची तयारी भाजपकडून सुरू करण्यात आली आहे. महापालिका निवडणूक भाजप स्वबळावर लढणार, की महायुती म्हणून लढणार, याबाबत संदिग्धता आहे.



मात्र, तयारी सुरू केल्यानंतर कोणाच्या नेतृत्वात निवडणूक लढविली जाणार, याची उत्कंठा आहे.

विधानसभा निवडणुकीतील घवघवीत यशामुळे आत्मविश्वास दुणावलेल्या भारतीय जनता पक्षाने आगामी महापालिका निवडणुकीसाठीची तयारी सुरू केली असली, तरी ही निवडणूक खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या, की मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढविली जाणार, याबाबतची चर्चा सुरू झाली आहे.या दोघांपैकी एकाकडे शहर भाजपचे नेतृत्व जाणार असल्याची चर्चा असून, भाजपमधील नेतृत्वासाठीची स्पर्धाही वाढण्याची शक्यता आहे.

फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजपला ऐतिहासिक यश मिळाले. भाजपचे शंभर नगरसेवक विजयी झाले होते. गेल्या दोन वर्षांपासून महापालिका निवडणूक लांबणीवर पडली आहे. त्यातच महापालिकेतील सत्ता राखण्याचे भाजपपुढे आव्हान आहे. राज्यात आणि महापालिकेत एकाच पक्षाची सत्ता असल्यास संबंधित पक्षाचा » पान ३ वर



### महाराष्ट्राची अवस्था युपी, बिहारपेक्षा वाईट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. त्यांच्या कुटुंबीयांची सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी सांत्वनपर भेट घेतली. यावेळी बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या की, गेली पंधरा वर्ष सरपंच असणारे, सर्वांना सहकार्य करणारे संतोष देशमुख हे आदर्श सरपंच होते. त्यांचा काही संबंध नसताना, त्यांच्यावर व्यक्तिगत हल्ला करून त्यांची हत्या केली जाते. हे चित्र अतिशय भयानक आहे. सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्राची अवस्था यूपी बिहार पेक्षा वाईट केली आहे.

## लाडक्या बहिणींसाठी मिळाली खुशखबर!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी असून लाडकी बहीण योजनेच्या सहाव्या हफ्त्याबाबत महत्वाची बातमी समोर आलीआहे. डिसेंबर महिन्याच्या हप्ता कधी जमा होणार याची गेल्या अनेक दिवसांपासूनचर्चा सुरू आहे. आता महिलांना सहाव्या हफ्त्याचे पैसे कधी येणार याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाची माहिती दिली आहे. डिसेंबर महिन्याचा हप्ता देण्याची प्रक्रिया कालपासून (मंगळवार) सुरू करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीवेळी महायुतीने आपल्या जाहीरनाम्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या रक्कमेत ६०० रुपयांची वाढ करुन २१०० रुपये करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली होती. त्यामुळे डिसेंबरचा हफ्ता २१०० रुपये येणार की १५०० रुपये येणार याची चर्चा सुरू होती. मात्र आता सहावा हप्ता हा जुन्या धोरणाप्रमाणे १५०० रुपये येणार असल्याचे सांगितले जात आहे.



येत्या आठवडाभरामध्ये राज्यातील लाडक्या बहिणींना डिसेंबरच्या हफ्त्याचे पैसे मिळणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यामुळे लाडक्या बहिणींचा वर्षाचा शेवट गोड होणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीसांगितले की, राज्यातील लाडक्या बहिणींना येत्या आठवडाभरात सहाव्या हफ्त्याचे पैसे दिले जातील.लाडकी बहिणी योजनेच्या लाभार्थी महिलांच्या खात्यात वर्षाअखेर पर्यंत पैसे जमा होणार आहेत. मात्र हा हफ्ता २१०० रुपये मिळणार नसून १५०० रुपये असणार आहे. आतापर्यंत महिलांना साडे सात हजार रुपये मिळाले आहेत.सहाव्या हफ्त्याचे पैसे मिळाल्यानंतर या योजनेअंतर्गत लाडक्या बहिणींना एकूण ९००० रुपये मिळतील.

## भिसे यांच्या कादंबरीचे हजारे यांच्या हस्ते प्रकाशन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शीतील दिवंगत लेखक कै. शंकर भिसे यांच्या 'फरफट' या कादंबरीचे प्रकाशन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते राळेगणसिद्धी येथे करण्यात आले. ही कादंबरी बार्शीचे दिवंगत पत्रकार कै. शंकर भिसे यांनी अण्णा हजारे यांना समर्पित केली होती व त्यांच्या हस्ते या कादंबरीचे प्रकाशन व्हावे अशी त्यांची मनोमन इच्छा होती. त्यांच्या मृत्यूपश्चात तब्बल सात वर्षांनी अखेर या कादंबरीचे पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या हस्ते प्रकाशन संपन्न झाले. त्यामुळे, वडिलांची इच्छा लेकानं पूर्ण केली.

### शेतीच्या बांधावर वाद! अख्ख कुटुंब संपवलं

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी :** सोलापुरातील बार्शी तालुक्यात डोकं सुन्न करणारी घटना घडली आहे. किसन पाटील आणि सौदागर पाटील यांच्यात शेतीच्या बांधावर वाद होत होता. दोघे नात्याने काका- पुतणे आहेत. सोमवारी नेहमीप्रमाणे किसन पाटील त्याची पत्नी सिंधु व मुलगा सागर शेतात चालले होते. त्यावेळी सौदागर पाटीलने शिवीगाळ करत चुलती आणि चुलत भावाच्या पोटात चाकू खुपसला. यात दोघांचा मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या किसन पाटीलला उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### संतोष देशमुख हत्येचा करणार निषेध; सरपंच परिषदेचा निर्णय

## राज्यातील गावगाडा ९ जानेवारीला होणार ठप्प!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मस्साजोगमधील घटनेचा निषेध करण्यासाठी व आरोपींना अटक करण्यात यावी यासाठी आखिल भारतीय सरपंच परिषदेने ९ जानेवारी राज्यातील ग्रामपंचायती बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे पडसाद राज्यभर उमटले आहे. त्यांच्या हत्येचा राज्यभर निषेध केला जात असून आरोपींना अटक करण्याची मागणी होत आहे. आता अखिल भारतीय सरपंच परिषदेने देखील या प्रकरणी पुढाकार घेत राज्यातील ग्रामपंचायत बंद ठेऊन आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

९ जानेवारीरोजी राज्यातील सर्व ग्रामपंचायती




बंद ठेवण्यात येणार असून संतोष देशमुखांना श्रद्धांजली देखील यावेळी वाहण्यात येणार आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यांचे अपहरण करून त्यांना बेदम मारहाण देखील करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यांच्या हत्येप्रकरणी वाल्मीक कराड यांचे नाव पुढे आले असून विधानसभे देखील यावरून गदारोळ झाला. या प्रकरणाचा सीआयडी मार्फत तपास करण्यात येणार व दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध राज्यभर सुरू आहे.

अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या शिष्टमंडळाने संतोष देशमुख यांच्या परिवाराची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. राज्यात एखाद्या सारपंचाची या पद्धतीने अमानुष हत्या झाली. त्यांच्या आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी सरपंच परिषदेने केली.

वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

'दै.पंढरी संचार'

आजच आपला अंक विक्रेत्यांकडे बुक करा अथवा कार्यालयाशी संपर्क साधा.

- संपर्क -

रविकिरण पाटील - ८२०८९४२३४६

दत्तात्रय बनसोडे - ९९०९७६४७५

बुकिंग मर्यादा २८ डिसेंबरपर्यंत.

**सोलापूर** : महाराष्ट्रात पुढील तीन दिवसांत काही जिल्ह्यांमध्ये पाऊस आणि गारपिटीची शक्यता आहे, असे हवामान विभागाने वर्तवले आहे. 26 डिसेंबरला धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक यांसारख्या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आले आहे. 27 डिसेंबरला पुणे, जालना, बीड, परभणी, अकोला आणि इतर जिल्ह्यांना यलो अलर्ट मिळालं आहे. 28 डिसेंबरपासून राज्यभर गारपिटीसह पाऊस होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी हवामानाच्या बदलांचा विचार करून नियोजन करण्याचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

### रत्नत्रय संस्थेत बाजार दिवस साजरा

# हिशोबात अतिशय ट्रान्सपरन्सी असणारी एकमेव संस्था म्हणजे रत्नत्रय - गांधी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : शिक्षणाबरोबरच संस्कार आणि व्यवहार ज्ञान देणारी निसर्ग सौंदर्याच्या सानिध्यात असणारी , उत्कृष्ट इन्फ्रास्ट्रक्चर ,प्रशिक्षित शिक्षक वर्ग ,भव्य मैदान ,झाडे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी,हिशोबात अतिशय ट्रान्सपरन्सी; असणारी एकमेव संस्था आणि अशा शिक्षण संस्थेतून डॉक्टर, इंजिनियर, वकील सोबतच अनेक सी.ए तयार व्हावेत, देशाचा आर्थिक कणा मजबूत करण्यासाठी शालेय जीवनामध्ये व्यवसाय व औद्योगिक ज्ञान मिळणे आवश्यक आहे, तसेच रत्नत्रय ही संस्था अतिशय ट्रान्सपरन्सी असणारी एकमेव संस्था आहे असे उद्गार शशील गांधी यांनी प्रतिपादित केले

शाळेत बाजार दिवस आयोजित केल्यास देशाचा आर्थिक कणा मजबूत करणारे यशस्वी उद्योजक तयार होतील.

*If you are great demand in the market you are the king of market,* असा महान अर्थशास्त्रज्ञांचा दाखला देत बाजार दिवस यशस्वी उद्योजक तयार करण्यासाठी साजरा करावा मागणी, पुरवठा, वजन मापनशास्त्र ,मार्केटिंग कौशल्य ,व्यवहार ज्ञान ,पैशाची किंमत, अशी पंचसूत्री आवश्यक असून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक, उद्योजक बनण्यासाठी ही पंचसूत्री शालेय जीवनातच आत्मसात करायला शिकवले पाहिजे असे मत शनिवार 21 डिसेंबर रोजीरत्नत्रय इंग्लिश मीडियम स्कूल, विद्यालय ज्यु. कॉलेज मांडवे येथे आयोजित करण्यात आलेल्या बाजार दिवसानिमित्त मा. ॲड. मयूर शहा यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

तर 21 डिसेंबर चे महत्व म्हणजे वर्षातील सर्वात मोठी रात्र व लहान दिवस या दिवसालाच हिवाळी संक्रांत असे हे म्हणतात असे 21 डिसेंबर चे महत्व मा. नितीन कुदळे यांनी मनोगतातून पटवून दिले.



बाजार दिवसाच्या माध्यमातून व्यवहार ज्ञान तर कळतेच पण विद्यार्थ्यांना कुटुंब कसे चालते याचे हे ज्ञान येते. माळशिरस तालुक्यातून अनेक विद्यार्थी घडावेत यासाठी अकलूज सी. ए. असोसिएशन विद्यार्थ्यांना सी.ए. बनण्यासाठी मार्गदर्शन करेल असे आश्वासन रिखवलाल फडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून दिले.

सामाजिक विचार घेऊन सुरू झालेली संस्था अनेक राष्ट्रीय सण ,सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा विषयक माहिती प्रात्यक्षिक ज्ञान देऊन विद्यार्थ्यांना प्रगत बनवते परंतु सर्व विद्यार्थी नोकरी करू शकतात असे नाही तर जे विद्यार्थी उद्योगाकडे वळतात त्यांना व्यवहार ज्ञान कळावे यासाठी बाजार दिवसाचे आयोजन दरवर्षी केले जाते. असे विचार माननीय अनंतलाल दोशी यांनी मार्गदर्शनातून व्यक्त केले.

बालचमूंचा आनंदी बाजार दिवस यामध्ये 199 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यामध्ये विविध पालेभाज्या, फळभाज्या, खाद्यपदार्थ, जनरल स्टोअर्स, थंड पेय इत्यादी विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आलेले होते बाजारात जवळजवळ 1.97 लाखापर्यंतची उलाढाल झाली.

हा दिवस साजरा करण्यासाठी प्रमुख पाहुणे मा. रिखवलाल फडे सी.ए. अकलूज मा. अनंतलाल दोशी दादा संस्थापक अध्यक्ष रत्नत्रय परिवार, मा. शशील गांधी सी.ए अकलूज, मा. नितीन कुदळे सी.ए. अकलूज, मा. अमित दोशी सीए माळशिरस, मा श्री मयूर फडे सी.ए. अकलूज, मा. राहुल पिसे कर सल्लागार नातेपुते, मा. ॲड मयूर शहा कर सल्लागार नातेपुते, अजितकुमार दोशी, स. नगरचे सरपंच , संस्थेचे मार्गदर्शक वीरकुमार दोशी ,संस्था सचिव प्रमोद दोशी ,अभिजित दोशी, बाहुबली दोशी, वैभव शहा , अभिजीत दोभाडा ,अमित गांधी, रामदास कर्णे सुरेश धाईंजे ,रवींद्र कुलकर्णी, मृणालिनी दोशी ,भाग्यश्री दोशी, विनयश्री दोशी, पूनम दोशी ,धनश्री दोशी ,पार्वती जाधव, सारिका राऊत ,इत्यादी सर्व कमिटी मेंबर्स मुख्याध्यापक दैवत वाघमोडे, सर्व शाखा मुख्याध्यापक ,शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक इत्यादी सर्व मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता गाढवे व आभार वनिता निंबाळकर यांनी मानले.

## अजित पवार गटाला जिल्हाध्यक्षपद मिळणार का?



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला** : अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे पाटील यांनी राजीनामा दिला. तेव्हापासून जिल्हाध्यक्ष पद रिक्त आहे. साळुंखे-पाटील यांनी मशाल हातात घेऊन सांगोल्याची निवडणूक लढविली. मात्र, त्यांचा पराभव झाला. तेव्हापासून ते ठाकरे गटात दिसले नाही. ते पुन्हा अजित पवारांकडे जाणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. मात्र, मंत्रिमंडळ विस्तार, अधिवेशन, खातेवाटप या घडामोडींमुळे जिल्हाध्यक्ष पदाकडे दुर्लक्ष झाले होते. अजितदादा गटाला एकही जागा मिळाली नाही. जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर सक्षम जिल्हाध्यक्ष नेमणे आवश्यक आहे.

## Selected

## लिपिक पदासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात भरती




**सोलापूर** : सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक-टंकलेखकाचे अशासकीय एक पद भरावयाचे आहे. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह बुधवार दिनांक 1 जानेवारी 2025 रोजी प्रत्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे. या पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येणार असल्याने उमेदवारांनी स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. या पदाकरीता उमेदवारास मराठी व इंग्रजी टंकलेखन व संगणक हाताळणीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

## टेंभुर्णी-लातूर महामार्गासाठी 574 कोटी निधी मंजूर



**बार्शी** : धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकरांनी काही दिवसांपूर्वी लोकसभेत टेंभुर्णी-लातूर महामार्गाच्या कामाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या महामार्गाच्या निधीच्या प्रस्तावास लवकर मंजुरी द्यावी. या महामार्गाचे काम तत्काळ सुरू करावे, अशी मागणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. चौपदरीकरणामुळे रस्त्यावरील वाहनांची गर्दी कमी होण्यास नक्कीच मदत होणार आहे. या महामार्गामुळे मराठवाड्याचा पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांशी संपर्क साधण्यासाठी कमी वेळ लागणार आहे.

## थंडीमुळे केळीवर चिलिंगचा प्रादुर्भाव



**करमाळा** : कडाक्याच्या थंडीने केळीवर चिलिंगचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने केळीचे दर पडले आहेत. चिलिंगमुळे केळीच्या सालीच्या आतल्या भागात लालसर रंगाचे ठिपके दिसतात. त्यामुळे केळी पिकल्यानंतर सालीवरील एकसारखा पिवळसर रंग आणि चमक कमी राहते. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून भावामध्ये फरक केला जात आहे. त्याचा फटका केळी उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे

## भोयरे येथे दुहेरी हत्याकांड

**बार्शी** : बार्शी तालुक्यातील भोयरे गावात शेतीच्या रस्त्याच्या वादातून कुटुंबातील दोन व्यक्तींचा खून आणि तिसरी व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आरोपी सौदागर पाटील याने चुलते, चुलती आणि चुलत भावावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात सिंधू किसन पाटील (वय ४५) आणि सागर किसन पाटील (वय २६) यांचा मृत्यू झाला, तर किसन गोवर्धन पाटील (वय ५५) गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



## माढा येथे शुक्रवारी आमदर अभिजीत पाटील यांच्या उपस्थितीत सन्मान सोहळा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा** : माढा येथे विद्यार्थी आणि शिक्षक यांचा कृतज्ञता सन्मान व कौतुक सोहळ्याचे आयोजन शुक्रवार ता.27 रोजी सायंकाळी सहा वाजता आमदार अभिजित पाटील व माढ्याच्या नगराध्यक्ष मिनलताई साठे यांच्या उपस्थित करण्यात आले असल्याची माहिती डॉ.राजकुमार अडकर यांनी दिली. माढा येथील सुयश आडकर याना चंद्रपूर शासकीय महाविद्यालयात व सृष्टी आडकर यांना अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात येणार असून माढा येथील पहिली ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांचा देखील सन्मान यावेळी करण्यात येणार असल्याचे डॉ. राजकुमार आडकर यांनी यावेळी सांगितले. तरी या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकाच्यावतीने करण्यात आले आहे.




## भेट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर** : राज्याचे नवनिर्वाचित सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख यांनी त्यांच्या सातारा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी देशमुख यांनी मंत्रिमंडळात मोठी जबाबदारी मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच छत्रपती शिवेंद्राराजे यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम विभाग अधिक मजबूत व प्रभावी होईल, यावर मला विश्वास आहे, असेही देशमुख म्हणाले

## खडकाळ माळरानावर फुलवली फळबाग



**सांगोला** : खरबूज पिकाची लागवड प्रामुख्याने जानेवारी ते मार्च या दरम्यान केली जात असते. मात्र दुष्काळी ओळख असलेल्या सांगोला तालुक्यात शेतकऱ्याचा हिवाळ्यातील खरबूज लागवडीचा प्रयोग यशस्वी झाला आहे. योग्य नियोजनातून हे शक्य होत असून एकरी १२ लाख रुपयांचे उत्पन्न शेतकऱ्याला अपेक्षित आहे. पंढरपूर जिल्ह्यातील सांगोल्यातील सोनलवाडी येथील शेतकरी नाथा हेगडे यांनी खडकाळ माळरानावर दोन एकर क्षेत्रावर बॉबी खरबूज लागवड केली आहे. मुळात जानेवारी ते मार्च या दरम्यान लागवड करण्यात येत असलेल्या खरबूजची लागवड हिवाळ्यात केली.

## आपले सरकार पोर्टल वरील तक्रारींचा निपटारा करावा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : सोलापूर जिल्ह्यात 19 ते 24 डिसेंबर 2024 या कालावधीत सुशासन सप्ताह साजरा केला जात आहे, याच अनुषंगाने सर्व शासकीय विभागांनी व त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांनी त्यांच्याकडे येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारी तसेच आपले पोर्टल सरकारवर येणाऱ्या विविध तक्रारींचा त्वरित निपटारा करावा. आणि सर्व शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत अत्यंत गतिमान पद्धतीने पोहोचवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज केले. अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती निमित्त 25 डिसेंबर हा सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

## सालगड्याने सोने चोरीच्या उद्देशाने केला खून

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ** : ज्याच्या शेतात काम करतो त्याच द्राक्ष बागायतदाराचा सालगड्याने सोने चोरीच्या उद्देशाने खून करून मृतदेहाचे तुकडे तुकडे करून घराच्या पाठीमागे पुरुन पुरावा ही नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु या घटनेचा उलगडा करण्यात मोहोळ पोलिसांना यश आले. ही घटना यल्लमवाडी ( ता मोहोळ ) येथे घडली. कृष्णा नारायण चामे वय (५२) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडी येथील कृष्णा चामे हे कुटुंबासमवेत काळेवाडी, पुणे येथे राहत होते. यल्लमवाडी येथे १० ते १५ दिवसातुन येऊन जाऊन शेती करत होते. शेतातील द्राक्षांच्या बागेची औषध फवारणी व इतर शेती कामासाठी त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील सांगवी येथील सचिन भागवत गिरी याला कामाला ठेवले होते. दरम्यान दि. १४ डिसेंबर रोजी ९ वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या राहत्या घरातून दोन अज्ञात व्यक्तींनी दुचाकीवरून येऊन चामे यांच्या अंगावरील सोने घेण्याकरता किंवा अज्ञात कारणास्तव त्यांचे अपहरण केले असल्याची फिर्याद त्यांचा मुलगा विश्वजीत चामे याने मोहोळ पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक रणजीत माने यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा तपास सुरू होता. तपासा दरम्यान मयत कृष्णा चामे यांच्या शेतात काम करणारा सचिन गिरी याच्यावर पोलिसांचा संशय बळावला. याबाबत पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने पोलिसांना दिलेल्या कबुली जबाब मध्ये मालक कृष्णा चामे यांचा हातोड्याने मारहाण करून खून करून मृतदेहाचे चाकूने तुकडे करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने पुरून ठेवले असल्याचे सांगितले. व ते तुकडे पोलिसांना त्याने काढून दिले. मृत कृष्णा चामे यांच्या अंगावरील सोन्याचे दागिनेही काढून दिले.अंगावरील सोने चोरी करण्याच्या उद्देशाने कृष्णा चामे यांचा खून केल्याप्रकरणी सचिन गिरी याच्यावर मोहोळ पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक रणजीत माने करीत आहेत.घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी यामावार, मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत माने आदींनी घटनास्थळी भेट दिली.




### वकृत्व स्पर्धेत श्रीराम शिक्षण संस्थेचे घवघवीत यश

# खुल्या गटात आरती मगर प्रथम तर अकरावी ते बारावी गटात कादंबरी मगर द्वितीय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस** : जवाहर शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव ( म.) ता. माळशिरस यांच्यावतीने देशभक्त गुरुवर्य कै. धनंजयराव इनामदार यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा दि. २२ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

या स्पर्धेत श्रीराम शिक्षण संस्था संचलित श्रीराम इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयात शिक्षण घेत असलेली कुमारी आरती जयसिंग मगर हिने खुल्या गटात "लक्षात नसलेला बाप" या विषयावर मनोगत व्यक्त करून प्रथम क्रमांक मिळवला आहे तर श्रीराम शिक्षण संस्था संचलित कै. राजेंद्र शामराव पाटील विद्यालय पानिव या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कु.कादंबरी तात्यासो मगर या विद्यार्थिनीने इयत्ता अकरावी व बारावी या गटात " धर्मवीर संभाजी राजे " या विषयावर आपले मनोगत व्यक्त करून द्वितीय क्रमांक मिळविला आहे या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील मार्गदर्शक श्रीलेखा पाटील संस्थेचे उपाध्यक्ष करण पाटील सचिव ॲड. अभिषेक पाटील, सहसचिव डॉ. समीर पवार व संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी भाऊसो वनवे महाविद्यालयाचे प्राचार्य डावकरे राजेंद्र, प्राचार्य सुभाष घुले विभाग प्रमुख संतोष बोडके तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी या यशाचे मन:पूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी तिला शुभेच्छा दिल्या.



**सोलापूर :** सोलापुराच्या सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात चक्क दूध पिणारा कोंबडा आढळून आलाय. राजा अस या दूध पिणाऱ्या कोंबड्याचे नाव असून वनराज क्रॉस जातीचा हा कोंबडा आहे. ज्या पद्धतीने एखाद्या पैलवानला खुराक दिली जाते अगदी तशाच पद्धतीची या राजा नावाच्या कोंबड्याची खुराक आहे. हा कोंबडा दररोज सकाळी मका भरडा आणि भुसा खातो तर दुपारी तांदूळ, गहू, बाजरी खातो आणि रात्रीच्या वेळेस भुसा तसेच 100 मिली दूध पितो. या कोंबड्याचे तब्बल 6 किलो वजन असून 12 महिने याची वय आहे.

# स्वेरीमध्ये 'अवकाश महायात्रे'चे उदघाटन

## सर्वसामान्य माणसांना विज्ञानाविषयी जनजागृती व्हावी यासाठी 'विज्ञान भारती'ची निर्मिती-देवधर

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** 'विज्ञानामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला फायदा व्हावा यासाठी माझे अविरत कार्य सुरू आहे. विज्ञानाच्या माध्यमातून समाजातील प्रश्न कसे सोडवायचे याबद्दल जनजागृतीचे कार्य हाती घेतले आहे. विज्ञान भारतीची निर्मिती सर्वसामान्य माणसांसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसित भारतासाठी योगदान देण्यासाठी झाली आहे. हे कार्य अखंड सुरु राहील.' असे प्रतिपादन शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास स्थापना (ए.आर.डी.इ.- अरमामेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टयाब्लिशमेंट) चे सेवानिवृत्त समूह संचालक शास्त्रज्ञ डॉ.काशिनाथ देवधर यांनी केले.

अंतराळातील महत्वाची माहिती देण्यासाठी भारतीय अंतराळ संस्थेने (इस्त्रो) मोहीम हाती घेतली असून केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या इस्त्रोने अंतराळाच्या ज्ञानाचा सर्वांना लाभ घेता यावा यासाठी एक विशेष बस तयार केली असून या बसच्या माध्यमातून चंद्र, सूर्य, ग्रह, तारे जवळून पाहण्याची अनुभूती घेत अंतराळाची वैज्ञानिक माहिती घेता येणार आहे. 'विज्ञान भारती' आणि 'इस्त्रो' यांच्या संयुक्त विद्यमाने या अंतरीक्ष महायात्रेचे उदघाटन ए.आर.डी.इ.चे सेवानिवृत्त समूह संचालक शास्त्रज्ञ डॉ.काशिनाथ देवधर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते विज्ञान आणि सीमेवरील अवघड कार्य यावर सविस्तर माहिती देत होते. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर पदवी अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष विभागाचे प्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी शास्त्रज्ञ डॉ.काशिनाथ देवधर यांनी देशासाठी केलेल्या कार्याची व दिलेल्या योगदानाची सविस्तर व थक्क करणारी माहिती दिली. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे प्रास्ताविकात म्हणाले की, 'माणसाने सर्वप्रथम आपल्या देशावर, राज्यावर, जिल्ह्यावर, तालुक्यावर, आपल्या परिसरावर व आपल्या माणसांवर प्रेम करावे. हे करत असताना आपण समाजासाठी काहीतरी केले पाहिजे ही मानसिकता देखील बाळगली पाहिजे. 'उच्च शिक्षण' किती घेतले? यापेक्षा त्याच्यावर 'संस्कार' किती आहे ? याला आज प्राधान्य दिले जाते. यासाठी विद्यार्थ्यांनी 'लर्निंग थ्रू एक्सपोजर' साठी तयार रहावे.' असे आवाहन देखील त्यांनी केले. पुढे बोलताना प्रमुख पाहुणे शास्त्रज्ञ डॉ. देवधर म्हणाले की, 'माझी भेट शास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर यांच्याशी झाली तेंव्हा ते म्हणाले, 'विज्ञानाविषयी जनजागृती करणार असाल तर पंढरपूरजवळ गोपाळपूर येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला एकदा भेट द्या' असे सांगितल्याने मी स्वेरीत आलो. पुढे ते म्हणाले 'रणगाड्याची अचूकता वेगवेगळ्या माध्यमातून पाहिली जाते. रणगाड्याची अचूकता वाढविण्याचे कार्य देवधरांकडे होते. या कार्यातून मला सर्वप्रथम प्रेरणा मिळाली. देशासाठी जवान अहोरात्र कार्य करतात कारण शत्रू अचानकपणे हल्ला करतो. यासाठी वेळेकडे न पाहता रात्रंदिवस कामात कसे राहायचे व देशासाठी आपला वेळ कसा द्यायचा हे त्यातून शिकता आले.' असे सांगून त्यांनी शास्त्रज्ञ प्रा.सतीश धवन, विक्रम साराभाई, न्यूटनचे नियम, डीआरडीओ संस्था, चांद्रयान, मंगळयान यासाठी इस्त्रो तील कार्य, विविध प्रयोग या प्रमुख बाबींवर लक्ष वेधून त्याबाबत सविस्तर माहिती दिली. उदघाटनाच्या अर्थात पहिल्या दिवशी अनेक शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षकांनी भेटी दिल्या. आता दुसरा दिवस बुधवार (दि.२५ डिसेंबर) ही प्रदर्शनाची शेवटची संधी असून आणखी शाळा स्वेरीकडे येत आहेत. यावेळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) चे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, संशोधन अधिष्ठाता डॉ.ए.पी. केणे, प्रशासन अधिष्ठाता डॉ.आर.आर.गिड्डे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.एम.पी.ठाकरे, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ.डी. ए. तंबोळी, एम.बी. ए.चे विभागप्रमुख डॉ.के.पी. गलानी, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.एस.बी.भोसले यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. 'हर काम देश के नाम' या विद्यार्थ्यांना दिलेल्या संदेशानुसार डॉ. देवधरांचे कार्य अक्षरशः डोळ्यात अंजन घालण्यासारखे आहे, हे मात्र नक्की.

# आरोपी कोणताही असो, तात्काळ कारवाईची मागणी



**सोलापूर :** रासंतोष देशमुख यांच्याशी संबंधित प्रकरण सध्या मोठ्या वादग्रस्त चर्चेत आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते भोलेनाथ पाटील यांनी स्पष्टपणे आपले मत मांडले आहे. "संतोष देशमुख प्रकरणात आरोपी कोणीही असो, मग तो धनंजय मुंडे असो किंवा त्यांचे वडील, किंवा तो कोणत्याही पक्षाचा असो, संबंधितांवर तात्काळ आणि कठोर कारवाई करावी," असे पाटील यांनी ठामपणे सांगितले. आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते भोलेनाथ पाटील यांनी सांगितले की, यामुळे समाजामध्ये अशांतता पसरते त्यामुळे दोषीवर कारवाई झालीच पाहिजे.

» पान १ वरुन

# काँग्रेसचे सर्व दावे फेल !

पण हे फक्त ६ विधानसभा मतदारसंघात वाढलं आहे.

काँग्रेसने याशिवाय असाही दावा केला होता की, मतदान कमी झाल्यानंतरही ते जास्त दाखवण्यात आलं. वोटर टर्नआऊटमध्ये बदल केला जात आहे. याचे पुरावे देताना काँग्रेसने सायंकाळी ६ वाजल्यानंतरचं वोटर टर्नआऊट आणि शेवटी सांगण्यात आलेला आकडा ४ ते ५ टक्के जास्त असल्याचा दावा केला होता. निवडणूक आयोगाने काँग्रेसच्या या दाव्यालासुद्धा उत्तर दिलं आहे. आयोगाने सांगितलं की, वोटर टर्नआऊटमध्ये बदल अशक्य आहे. कारण उमेदवारांच्या एजंटकडे फॉर्म १७ सी आहे. यात मतदान संपल्यानंतर टक्केवारीचा आकडा नोंद केला जातो. काँग्रेसला हवं असेल तर त्यांनी तो आकडा पडताळून बघावा.

राज्यात ५० विधानसभा मतदारसंघात जुलै ते नोव्हेंबर पर्यंत ५० हजार मतदार वाढल्याचा आणि वोटर टर्नआऊट बदलल्याचा आरोप काँग्रेसने केला होता. मतदानात फेरफार केल्यानं राज्यातील या ५० पैकी ४७ मतदारसंघात भाजपच्या नेतृत्वाखाली महायुतीचा विजय झाल्याचा आरोप काँग्रेसने केला. मात्र काँग्रेसचे हे आरोप निवडणूक आयोगाने फेटाळून लावले आहेत.

## विरोधकांकडून फेक नऱ्हेटिव सेट....

असुरक्षित असल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणाचे अधिवेशनातही पडसाद उमटले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या प्रकरणाबाबत कडक कारवाईचा इशारा दिला आहे. तर अशा लोकांचा कडेकोट बंदोबस्त केला जाईल असा इशारा उदय सामंत यांनी बोलताना दिला आहे. मराठी माणसाला जर मारहाण होत असेल तर कारवाई करू. महाराष्ट्र सगळ्या जातींना घेऊन चालणारे राज्य असल्याचे ते यावेळी सांगितले आहे.

आमच्या अनेक मंत्र्यांना बंगले दिले गेले आहेत. आणि फ्लॅट सुद्धा दिले गेले आहेत.आमच्या मध्ये बंगल्यावरून वाद होणारं नाही हे नक्की आहे. शिवसेना पुणे महानगरपालिकेत सत्तेत येईल असेच काम करू. पुण्याचा महापौर आमच्या विचाराशिवाय होणार नाही असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. तानाजी सावंत मला सिनियर आहेत. मुख्यमंत्री त्यांच्याशी चर्चा करतील त्यांची नाराजी नक्की दूर करू आमचं कुटुंब आहे. एकनाथ शिंदे कुटुंबप्रमुख आहेत बीड आणि परभणी बद्दल बाकीच्यांचं मला माहिती नाही. आम्हीं शेवटच्या आरोपींपर्यंत पोहोचू, त्यांना नक्की न्याय मिळेल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले आहे.

## भाजप कोणाच्या नेतृत्वात निवडणूक...

खासदार पक्षाबरोबर शहराचेही नेतृत्व करतो, हे अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. काँग्रेसचे माजी मंत्री सुरेश कलमाडी यांनी काही काळापूर्वी पुण्याचे एकहाती नेतृत्व केले होते. केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता आल्यानंतर भाजपचे दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्याकडे शहराचे नेतृत्व होते. कोथरूडमधून चंद्रकांत पाटील विजयी झाल्यानंतर शहर नेतृत्वासाठी बापट आणि पाटील यांच्यातील शीतयुद्धही चर्चेचा विषय ठरला होता. शिंदे-फडणवीस यांच्या सरकारच्या काळात पाटील यांच्याकडे पुण्याच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. अजित पवार यांचा महायुतीत समावेश झाल्यानंतर मात्र पवार यांच्याकडे पालकमंत्रिपद गेले आणि पाटील यांचा प्रभाव कमी झाला.

दरम्यानच्या काळात पुण्याची खासदारपदाची निवडणूक मुरलीधर मोहोळ यांनी लढवून जिंकली. त्यांना केंद्रात राज्यमंत्रिपदही मिळाले. शिवाय, विधानसभा निवडणुकीसाठी त्यांच्यावर पश्चिम महाराष्ट्राची जबाबदारीही देण्यात आली. ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याही जवळचे मानले जातात. त्यामुळे शहराचे नेतृत्व करण्यासाठीचे प्रबळ दावेदार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. दुसरीकडे, चांगल्या मताधिक्क्याने कोथरूडमधून विजयी झालेले चंद्रकांत पाटील अलीकडे शहरातील बऱ्याच उपक्रमांत लक्ष घालून शहराचे नेतृत्व करण्यास उत्सुक असल्याचा संदेशच त्यांनी एक प्रकारे दिल्याचे मानले जाते.

महापालिकेत भाजपची सत्ता असताना मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात सातत्याने लक्ष घातले होते. शहरातील अनेक प्रकल्पांना त्यांनी गती दिली होती. युतीचे सरकार असताना चंद्रकांत पाटील पालकमंत्री असले, तरी शहराची सर्व सूत्रे देवेंद्र फडणवीस यांच्याच हाती होती. त्यामुळे शहराचे नेतृत्व ठरवताना फडणवीस यांचा कौलही महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्या दृष्टीने ते मोहोळ की पाटील यांपैकी कोणाला संधी देणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे

# दादासाहेब साळवे--- दातृत्वाचे मूर्तिमंत उदाहरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** जि. प. कळंबोली शाळेचे विषय शिक्षक व कळंबोली केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख श्री. दादासाहेब साळवे यांनी दिले रुपये 21000 चे शिष्यवृत्ती प्रश्नसंच पंचायत समिती माळशिरस येथे दिनांक 23 डिसेंबर रोजी झालेल्या इयत्ता पाचवी व आठवी वर्गांच्या शिष्यवृत्ती मार्गदर्शन कार्यशाळेत श्री दादासाहेब साळवे सरांनी सालाबादप्रमाणे माळशिरस तालुक्यातील प्रत्येक पाचवीच्या वर्गासाठी एक अशा एकूण 100 नमुना प्रश्नसंचाचे वितरण शिक्षणविस्ताराधिकारी श्रीम सुषमा महामुनी यांचे हस्ते करण्यात आले.

माळशिरस तालुक्याचा शिष्यवृत्ती मधील टक्का वाढावा यासाठी दादासाहेब हे दरवर्षी नमुना प्रश्नसंच देत असतात. त्यांच्या या कार्याचे कौतुक सर्वत्र होत असतानाच ते मात्र याचे श्रेय न घेता तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी आपण फक्त थोडा हातभार लावतो एवढेच सांगतात. माळशिरस तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी आदरणीय प्रदीप करडे साहेब यांनी त्यांचे अभिनंदन करून आभार मानले.

## विहीर खोदल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**करमाळा :** तालुक्यातील गोयेगाव येथे जलसंपदा विभागाच्या जागेवर अतिक्रमण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध करमाळा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. दगडू मच्छिंद्र कांबळे, मच्छिंद्र मदिबा कांबळे व दिगंबर गुलाब कांबळे (सर्व रा. वाशिंबे, ता. करमाळा) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. यामध्ये भीमा उपसा सिंचनच्या केत्तूर शाखेच्या शाखाधिकारी सहाय्यक अभियंता श्रेणी २ श्रद्धा राजेंद्र मगदूम यांनी फिर्याद दिली आहे. गोयेगाव येथे जलसंपदा विभागाची उजनी धरणासाठी गट नंबर ८४ व ८५ ही जागा संपादित आहे.

# प्रश्न संचाची भेट

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माळशिरस :** जि. प. कळंबोली शाळेचे विषय शिक्षक व कळंबोली केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख श्री. दादासाहेब साळवे यांनी दिले रुपये 21000 चे शिष्यवृत्ती प्रश्नसंच. पंचायत समिती माळशिरस येथे दिनांक 23 डिसेंबर रोजी झालेल्या इयत्ता पाचवी व आठवी वर्गांच्या शिष्यवृत्ती मार्गदर्शन कार्यशाळेत श्री दादासाहेब साळवे सरांनी सालाबादप्रमाणे माळशिरस तालुक्यातील प्रत्येक पाचवीच्या वर्गासाठी एक अशा एकूण 100 नमुना प्रश्नसंचाचे वितरण शिक्षणविस्ताराधिकारी श्रीम सुषमा महामुनी यांचे हस्ते करण्यात आले.

# शालेय क्रिकेट स्पर्धेत सिंहगड पब्लिक स्कूल च्या मुला-मुलींचे संघ विजयी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सी.बी.एस.ई. बोर्डा अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सर्व सी.बी. एस.ई शाळांच्या वतीने मुलांच्या सर्व कला गुणांना, खेळाला व त्यांच्या कौशल्यत्मक व्यक्तिमत्वाला विशेष वाव व संधी देण्यासाठी सोलापूर सहोदया कॉम्प्लेक्स स्पर्धेची उभारणी केली आहे. याअंतर्गत शिवरत्न पब्लिक स्कूल अकलूज या ठिकाणी झालेल्या सोलापूर सहोदया कॉम्प्लेक्स अंतर्गत क्रिकेट स्पर्धेमध्ये सिंहगड पब्लिक स्कूलच्या 16 वर्ष वयोगटातील मुलांनी प्रथम क्रमांक मिळविला तसेच 16 वर्षे वयोगटातील मुलींनी प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले.

मुला मुलींच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक मा. श्री एम एन नवले सर, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे सर, शाळेच्या प्राचार्या स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मुला मुलींचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेसाठी मुला-मुलींना क्रीडा शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# सूर्यवंशी यांच्या मृत्यूची न्यायालयीन चौकशी करा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह राज्यातील आमदार, खासदार, काँग्रेसचे नेतेमंडळी यांनी सोमवारी परभणी येथे जाऊन परभणी येथे पोलीस कोठडीत मृत्यूमुखी पडलेल्या सोमनाथ सूर्यवंशी तसेच लोकनेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली व त्यांचे सांत्वन केले. यावेळी खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, पोलिस कोठडीत बेदम मारहाण करून सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या करण्यात आली. त्यांच्या मृत्यूची न्यायालयीन चौकशी करून त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे.

# तुमच्या मुळेच मला संसदेत काम करण्याची संधी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मी काँग्रेसची खासदार आहे, त्यामुळे लोकशाही जिवंत ठेवणे माझे काम आहे. मी राजकारणात कामे करण्यासाठी आली आहे, टक्केवारी घेण्यासाठी नाही. निवडून येण्यासाठी जनतेची कामे करावी लागतात, मला सत्कारासाठी फुलांच्या माळा ऐवजी कामाच्या निवेदनाच्या माळा द्या. मी प्रत्येक मताची किंमत मोजेन त्यासाठी "मी पुन्हा येईन" असे प्रतिपादन खासदार प्रणिती शिंदे यांनी केले. खा. प्रणिती शिंदे यांनी आपल्या मतदार संघात एका बैठकीचे आयोजन करुन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या त्याप्रसंगी खा. शिंदे बोलत होत्या. याप्रसंगी अनेक मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.

Selected

# विदेशी पक्ष्यांची उजनी जलाशयावर हजेरी



**करमाळा :** हिवाळ्यात उजनी जलाशयावर युरोप, उत्तर अमेरिकासह अंटार्क्टिका, रशिया, मंगोलिया, कझाकिस्तान, सायबेरियन येथून हजारो किलोमीटरचा प्रवास करून फ्लेमिंगोसह विविध प्रजातींच्या पक्ष्यांनी हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. करमाळा व इंदापूर तालुक्यातील उजनी धरण काठावर असलेल्या कुगाव, चिखलठाण, वांगी, कोंढारचिंचोली, कुंभारगाव, डिकसळ, पळसदेव, गंगावळण, भिगवण या उजनी पाणलोट क्षेत्राकडे देशी-विदेशी पश्यांची गर्दी दिस लागली आहे




**दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर**
**(मार्केट यार्ड शाखा)**
**नोटीस**

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार दिपक तुकाराम खांडेकर रा. पंढरपूर या नावावर अल्पबचत ठेव, सेव्हिंग ठेव खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांची पत्नी अर्जदार संध्या दिपक खांडेकर यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या,अल्पबचत ठेव, सेव्हिंग ठेव खात्यास अर्जदार संध्या दिपक खांडेकर यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे!

**पंढरपूर**
**तारीख - २४/१२/२०२३**

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर**
**( मार्केट यार्ड शाखा)**

**दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर**
**(मार्केट यार्ड शाखा)**
**नोटीस**

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार जयावती रविंद्रकुमार फडे रा. पंढरपूर या नावावर सेव्हिंग ठेव खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांची मुलगा अर्जदार रत्नशेखर रविंद्रकुमार फडे यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमुद केले व्यतिरिक अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमुद केलेल्या सेव्हिंग ठेव खात्यास अर्जदार रत्नशेखर रविंद्रकुमार फडे यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे!

**पंढरपूर**
**तारीख - २४/१२/२०२३**

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर**
**( मार्केट यार्ड शाखा)**

# सात रस्ता येथे एलईडी स्क्रीन लाईटिंगचे उद्घाटन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मोची समाजाचे कुलदैवत श्री आदि जांबमुनी महाराज यांच्या रथोत्सव निमित्त बाबा ग्रुपच्या वतीने सात रस्ता येथे श्री आदि जांबमुनी महाराजांच्या मुर्तीची महाआरती व एलईडी स्क्रीन लाईटिंगचे उद्घाटन सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोजगार हमी महामंडळाचे अध्यक्ष शहाजी पवार हे होते. यावेळी मोची समाजाचे अध्यक्ष व माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, उद्योगपती बिपीन भाई पटेल, माजी माजी महापौर संजय हेमगड्डी, माजी नगरसेविका वैष्णवी करगुळे आदी उपस्थित होते.

# आता हवा कार्यधडाका

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारमध्ये सहभागी झालेल्या मंत्र्यांचे खातेवाटप अखेर जाहीर झाल्यामुळे आता महायुती सरकारला कामाला लागावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मोठ्या प्रमाणावर बहुमत असूनही राज्यात मत्रिमंडळ अस्तित्वात येऊन कामाला लागायला तब्बल एक महिन्याचा कालावधी लागला आहे.गेल्या महिन्यात २३ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला होता त्याला आता महिना झाला आहे. जेव्हा जेव्हा विविध घटक पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन करतात तेव्हा अशा प्रकारचा विलंब लागतोच. पण यावेळी जरा जास्तच विलंब लागला आहे. मुळात २३ नोव्हेंबर रोजी जेव्हा महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याचे जाहीर झाले त्यानंतर मुख्यमंत्री कोण होणार याबाबत निर्णय घेण्यासाठी काही कालावधी गेला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होणार हे ठरल्यावर माजी मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रिपद स्वीकारणार की नाही हे ठरवण्यात काही कालावधी गेला. अखेर एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांचा शपथविधी झाल्यानंतर सरकार स्थापन झाले. पण मंत्रिमंडळाचा विस्तार करायलाही काही दिवस गेले. मंत्रिमंडळ विस्तारामध्ये ३९ मंत्र्यांचा समावेश झाल्यानंतर या मंत्र्यांना प्रत्यक्ष खाते मिळायला आणखीन काही दिवसांचा कालावधी गेला. ज्या पक्षाच्या पाठीशी बहुमताचा प्रचंड रेटा आहे त्या पक्षालासुद्धा सरकार स्थापन करण्याबाबत विलंब लागला आहे ही परिस्थिती महाराष्ट्राच्या राजकारणाने प्रथमच पाहिली. आता मंत्रिमंडळाचे खातेवाटप झाले असल्यामुळे सरकारचा गाडा हाकण्याचे सर्व मार्गही खुले झाले आहेत. अर्थात खाते वाटपावरून वाद विवाद होणार नाहीत असाही अर्थ नाही. कारण ज्या प्रकारे मंत्रिमंडळामध्ये भाजपाचा वरचष्मा आहे त्याच प्रकारे खातेवाटपामध्ये सुद्धा भाजपाने आपला वरचष्मा कायम ठेवला आहे. अर्थात, महायुतीतील सर्वात मोठा पक्ष म्हणून हे गृहीतच धरण्यात आले असले, तरी हेच करायचे होते तर एवढा विलंब का लावला याचे उत्तर मात्र मिळत नाही. देवेंद्र फडणवीस यांनी गृहखाते स्वतःकडेच ठेवले आहे, तर अर्थखाते नेहमीप्रमाणे अजित पवार यांच्याकडेच गेले आहे आणि नगर विकास व गृहनिर्माण ही खाती एकनाथ शिंदे यांच्याकडे गेली आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणातील जी प्रमुख तीन खाती मानली जातात ती तीन प्रमुख नेत्यांनी आपल्याकडेच ठेवली आहेत. मंत्रिमंडळ विस्तार करत असताना गेल्या मंडळातील काही अकार्यक्षम आणि वादग्रस्त मंत्र्यांना वगळण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याच प्रकारे ज्या मंत्र्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे त्यांच्या खात्यामध्येही बदल करून मुख्यमंत्र्यांनी योग्य संदेश देण्याचे काम केले आहे. मुख्यमंत्र्यांनी आपले जवळचे सहकारी चंद्रशेखर बावनकुळे यांना महसूल खाते दिले आहे, तर पूर्वी हे खाते सांभाळणारे राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे त्या मानाने कमी महत्त्वाचे जलसंपदा खाते दिले आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये सातारा आणि कोल्हापूर जिल्हे १०० टक्के महायुतीच्या पाठीशी उभे राहिले असल्याने या जिल्ह्यांतील मंत्र्यांना वजनदार खाती दिली आहेत. सार्वजनिक बांधकाम, पर्यटन, ग्रामविकास, आरोग्य, वैद्यकीय शिक्षण आणि पुनर्वसन अशी महत्त्वाची खाती सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील मंत्र्यांना मिळाल्यामुळे या प्रदेशातील महायुतीचा पाया अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने आणखी एक निर्णय घेण्यात आला आहे.गेल्या मंत्रिमंडळामध्ये एक्साइजसारखे महत्त्वाचे खाते शिवसेनेकडे होते पण यावेळी ते अजित पवार यांनी स्वतःकडे ठेवले आहे. या बदल्यात एकनाथ शिंदे यांच्याकडे गृहनिर्माण हे अतिरिक्त खाते देण्यात आले आहे. साधारणपणे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी या सर्व घटक पक्षांना मंत्रिमंडळ विस्तारामध्ये आणि खातेवाटपामध्येही योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसते. पण माजी मंत्री दीपक केसरकर यांनी शालेय गणवेशाबाबतच्या निर्णयावरून नाराजी व्यक्त केली आहे. मंत्र्यांची खाती बदलण्यात आली असल्याने आगामी कालावधीमध्ये काही नवीन निर्णय घेताना जुन्या मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाना धक्का लागणे साहजिक आहे. त्यावरून नवीन वाद विवाद निर्माण होऊ शकतात. अर्थात महायुतीच्या पाठीशी भक्कम बहुमत असल्यामुळे अशा प्रकारच्या छोट्या वाद विवादांकडे लक्ष दिले जाईल, असे नाही. पण एकीकडे मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे यांनी २५ जानेवारीपासून पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. त्यामुळे या महिन्याभराच्या कालावधीमध्ये नवे सरकार त्या दिशेने काही हालचाली करते का हे पाहणेही महत्त्वाचे आहे. दुसरीकडे लाडकी बहीणसारख्या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर जो भार पडला आहे त्याबाबत नियोजन करून उत्पन्न वाढवण्यासाठी काही नवीन निर्णय घेतले जातात का हे पाहणेसुद्धा उत्सुकतेचे ठरणार आहे. नागपूर येथे झालेले विधानसभा विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन फक्त एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांनीच पार पाडले. आता मार्चमध्ये जेव्हा विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होईल तोपर्यंत नवे मंत्रिमंडळ स्थिरस्थावर होईल आणि सर्व मंत्र्यांना आपल्या खात्याचा अभ्यास करून पूर्ण तयारीने विधिमंडळाला सामोरे जाता येईल. सरकार स्थापनेबाबतचे सर्व सोपस्कार आता पूर्ण झाले असल्याने महाराष्ट्रातील जनतेचे डोळे आता हे नवीन सरकार कसे काम करते हे पाहण्याकडेच लागले आहेत. सरकारने जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आता गंभीरपणे कामाला लागायला हवे.

> "वैद्यकीय क्षेत्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर हा नवी क्रांती आणणारा ठरणार आहे. एआयच्या साहाय्याने रुग्णाच्या तब्येतीनुसार अचूकपणे औषधोपचार देता येणे शक्य आहे. आजाराचा काळ आणि वेळ तसेच घ्यावयाची खबरदारी याचे विश्लेषण करत प्रत्येक रुग्णांवर अचूक उपचार करण्यासाठी सल्ला देऊ शकतो. आजाराची अनुवांशिकता, मॉलिक्युरल आणि ट्यूमर आधारित शक्यता लक्षात घेत उपचाराची कोणती पद्धत योग्य राहिल, यावर तो मार्ग काढू शकतो. अर्थात आरोग्य सेवेत जनरेटिव्ह एआयचा वापर करताना काही गोष्टी गमवाव्या लागतील. त्या म्हणजे मानसिक आधार देणारा मानवी स्पर्श आणि आजारपणातील आपुलकीच्या भावनेचा अभाव. दुसरी समस्या म्हणजे एआयने गोळा केलेला डेटा विश्वसनीय असेलच असे नाही. एआय तंत्रज्ञानाचा अचूक आणि प्रभावीपणे वापर करण्यासाठी प्रचंड प्रमाणात डेटा असणे गरजेचे आहे.

# उपचारप्रणालीतील एआय क्रांती

प्रा. राकेश कोचर, चंदीगड

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय' चा बोलबाला सर्वत्र होत असताना आरोग्य क्षेत्र तरी त्यापासून अपवाद कसे राहिल. एआय हे एकप्रकारे डिजिटल कॉम्प्युटर किंवा रोबो असून त्याचे कार्यक्षेत्र मानवी व्यवहाराशी जोडलेले आहे. अंदाज व्यक्त करणे, दैनंदिन कामाची हाताळणी करणे किंवा डेटाच्या आधारे विश्लेषण करणे यासारखी क्षमता एआयमध्ये असते. प्रामुख्याने प्रचंड प्रमाणात असलेल्या डेटाचे आकलन करत एआय 'अल्गोरिदम'ला ओळखण्याचे काम करतो आणि अधिकाधिक अचूकपणे आणि वेगाने विश्लेषणाचे निष्कर्ष काढतो. एआयचे हेच अत्याधुनिक तंत्रज्ञान डॉक्टरांना प्रभावीपणे उपचार करण्यात आणि जगभरात तणावाखाली वावरणाऱ्या आरोग्य सेवा प्रणालीला सुसह्य करण्याबरोबरच सकारात्मक परिणाम हाती लागण्यासाठी मोलाची कामगिरी बजावू शकतो.

जागतिक आर्थिक मंचाने डिजिटल हेल्थकेअरमध्ये बदल करताना जुनाट, असाध्य आजारांचे वाढते प्रमाण, जगभरातील रुग्ण बरे होण्यातील असमानता आणि आरोग्य सेवा व स्रोतांचा अभाव या तीन सर्वात महत्त्वाची आव्हानांवर मात करत संभाव्य तोडगा म्हणून एआयचा पर्याय वापरण्यास कायदेशीर मान्यता दिली. ही योजना संपूर्ण क्षमतेने अंमलात येताच भारत सरकार त्यास राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियानाला जोडून घेईल.

आरोग्य सेवेत एआयचा वापर करण्याची कल्पना औद्योगिक 'एआय'मधूनच आली. त्याची उत्पत्ती १९५० च्या दशकांत झाली. जॉन मकार्थीने १९५६ मध्ये डार्टमाउथ संमेलनात आर्टिफिशियल इंटिलिजन्स हा शब्द पहिल्यांदा प्रचलित केला. १९७० च्या दशकांत जगात पहिले आर्टिफिशियल मेडिकल कन्सल्टंट इंटरनिस्ट-१ तयार करण्याबरोबरच एआय क्षमतायुक्त मार्गदर्शन करणारा पहिला नमुना सादर करण्यात आला. त्याने रुग्णांच्या लक्षणाच्या आधारे आणि अल्गोरिदमचा वापर करत क्लिनिकल तपासणीतून निष्कर्ष काढण्यात यश मिळवले. एआयचे आधुनिक युग २००० च्या प्रारंभी व्हाईस रिकॉग्निशन फीचरच्या निर्मितीने सुरू झाले. आता त्यानंतर आयबीएमने वॉटसन नावाची प्रश्नाला उत्तर देणारी एक प्रणाली आणि नंतर २०२० मध्ये जीपीटी मॉडेल लाँच केले. कॉम्प्युटिंग शक्तीतील गुणात्मक सुधारणा, वेगाने डेटा संकलन, डेटा प्रोसेसिंग, जीनोमिक सिक्वेंसिंग डेटाबेटचा विकास आणि इलेक्ट्रॉनिक्स आरोग्य नोंदणी (इएचआर) सिस्टिमचा व्यापक वापर होऊ लागल्याने एआयच्या विकासात योगदान वाढत गेले.

सध्याच्या काळात 'एआय' तंत्रज्ञानात मशिन लर्निंग, डीप लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेस, कॉम्प्युटर व्हिजनसारखे तंत्रज्ञान आणि लार्ज लँग्वेएल मॉडेलसारखे (एलएलएम) अॅल्गोरिदम याचा समावेश आहे. यात सामील होणाऱ्या नव्या कंटेटला समजून घेणे, नवा कंटेट तयार करणे, संक्षिप्त रुप सादर करणे आणि भविष्यवाणी करणे यासाठी एआय महाकाय डेटाचे विश्लेषण करते. परिणामी एआयची व्यापक रुपातून चाचणी करण्यात आली. एक्स रे आणि फोटोग्राफीसारख्या इमेजिंगमध्ये त्याचा वापर करण्याची शक्यता असताना मधुमेह रेटिनोपॅथी, त्वचा कर्करोग आणि फुफ्फुसातील क्षयरोग यासारख्या आजाराची लक्षणे ओळखण्याचे मोठे काम केले आहे. शिवाय अल्जामयर आजाराची शक्यता व्यक्त करणारे आणि निदान करण्यात सक्षम असणारे मशिन मॉडेल सादर करण्यात आले आहे. कर्करोगाचे निदान, जोखमीची पातळी, औषधोपचार आणि मॉलिकुलर कॅरेक्टरायरजेशनसाठी एआयची उपयुक्तता कशी वाढेल, यावर काम केले जात आहे.

व्यावसायिकरित्या उपलब्ध असलेल्या एंडोस्कोपचा वापर करत सर्वंकष प्रणालीत एआय तंत्र हे बायप्सीसाठी नमुना घेताना येणाऱ्या अडचणींचा निपटारा करू शकते. एवढेच नाही तर कर्करोग होण्याची शक्यता देखील वर्तवू शकतो. एआयचा वापर रुग्णाच्या तब्येतीनुसार अचूकपणे औषधोपचारासाठी करता येऊ शकतो. आजाराचा काळ आणि वेळ तसेच घ्यावयाची खबरदारी याचे विश्लेषण करत प्रत्येक रुग्णांवर अचूक उपचार करण्यासाठी सल्ला देऊ शकतो. आजाराची अनुवांशिकता, मॉलिक्युरल आणि ट्यूमर आधारित शक्यता लक्षात घेत उपचाराची कोणती पद्धत योग्य राहिल, यावर तो मार्ग काढू शकतो. टेलिमेडिसीनचा वापर करत आज दुर्गम भागातील रुग्णांचा इसीजी अहवाल, एक्स रे, स्कॅनचे ऑनलाइन विश्लेषण केले जाते आणि याप्रमाणे उपचाराची दिशा निश्चित केली जाते. एआय अॅल्गोरिदम मेंदूवरचा आघात, इंट्राकेनिल हॅमरेज, पल्मनरी एम्बॉलिरम यासारख्या लक्षणाची तीव्रता ओळखण्यात महत्त्वाचे ठरते. मनुष्य बाळगत असणारे उपकरण, स्मार्टफोन आणि इंटरनेट आधारित तंत्रज्ञानाचा वापर करत रुग्णांच्या हृदयासंबंधीचा डेटा गोळा करता येऊ शकतो. याचा चांगला परिणाम म्हणजे हृदयासंबंधीचे धोके वेळीच कळण्यात हातभार लागेल. व्हर्च्युअल असिस्टंट आणि व्हर्च्युअल रिॲलिटीचा वापर करण्याबरोबरच शिक्षण आणि प्रशिक्षणात एआयची भूमिका वाढत आहे. अर्थात आजार ओळखण्यासाठीची चाचणी करणे, औषध आणि औषधाऔषधांतील ताळमेळ किंवा साइड इफेक्टबाबतची माहिती देण्यात एआयचा वापर पूर्वीपासूनच होत आहे. 'एआय'च्या काही आगामी प्रयोगात गुगलचे आरोग्य एलएलएम सुविधांचा समावेश असून त्यात वापरकर्त्यांना झोपेचा कालावधी, व्यायामाची गरज आणि हृदयाच्या गतीतील बदल आदींच्या आधारावर तंदुरुस्ती राखण्याबाबत सल्ला मिळेल. अन्य विकास संशोधनात आयबीएमचे वॉटसन ऑनकॉलाजी, गुगलचे डीपमाइंड प्लॅटफॉर्म, मायक्रोसॉफ्टचे हॅनोव्हर प्रोजेक्ट याचा समावेश आहे. दक्षिण आफ्रिकेत मेंडसोल एआय सोल्यूशन नावाच्या एका कंपनीने स्तनाचा कर्करोगाचे लक्षणे तात्काळ ओळखण्यासाठी अत्याधुनिक वायफाय युक्त अल्ट्रासाउंड तपासणी प्रक्रिया विकसित केली आहे.

अर्थात आरोग्य सेवेत जनरेटिव्ह एआयचा वापर करताना काही गोष्टी गमवाव्या लागतील. त्या म्हणजे मानसिक आधार देणारा मानवी स्पर्श आणि आजारपणातील आपुलकीच्या भावनेचा अभाव. दुसरी समस्या म्हणजे एआयने गोळा केलेला डेटा विश्वसनीय असेलच असे नाही. एआय तंत्रज्ञानाचा अचूक आणि प्रभावीपणे वापर करण्यासाठी प्रचंड प्रमाणात डेटा असणे गरजेचे आहे. पण सध्याच्या घडीला विविध जात समुदाय, अल्पसंख्याक तसेच वंचित समुदायाचे पुरेशे प्रमाणात प्रतिनिधीत्व केले जात नाही. त्यांच्या प्रती असणाऱ्या पूर्वग्रहामुळे एआयकडून केल्या जाणाऱ्या विश्लेषणात दोष राहू शकतात. सध्याच्या काळात बहुतांश एआय अॅल्गोरिदम हे श्वेतवर्णिय पुरुषांच्या डेटाच्या आधारावर आहेत. शिवाय रुग्णांची गोपनीयता आणि डेटा लीकची देखील भिती आहे. अॅल्गोरिदमने योग्यरित्या काम न केल्यास चुकीच्या दिशेने औषधोपचार होऊ शकतात. पारदर्शकतेचा अभाव राहिल्यास, योग्यरित्या विश्लेषण न केल्यास अडचणी येतील. एआय डेटाची अवस्था ब्लॅक बॉक्ससारखी असणे यासारख्या समस्या आहेत. जीनोमिक माहिती गोळा करताना नैतिकता ठेवणे, आयटी तंत्र कौशल्यासह त्याचे संकलन करणे, उपचाराबाबत विश्वासर्हता मिळवणे आणि सरकारी नियमांचे पालन करण्याबाबत बांधील राहणे यासारख्या देखील चिंता आहेत. भारतात एआयचा वापर करण्यास मोठा वाव आहे. आहार पोषण शिक्षण, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ प्रशिक्षित करणे आणि आरोग्य सुविधा यातील असमानता दूर करण्यासाठी एआय वरदान ठरू शकते. एआय तंत्रज्ञानाचा वापर रुग्णांची स्थिती जाणून घेण्याबरोबरच सुरुवातीला काही भागापुरती असणारी साथ भविष्यात महासाथीचे रुप धारण करते की नाही त्याविषयी भाकित करण्यासाठी एआयचे शास्त्रीय डेटा संकलन उपयुक्त ठरू शकते. उदा. डेंग्यू, मलेरिया, एन्सेफलायटिसच्या प्रकोपाबाबतचे भाकित, पाऊस, आर्द्रता आणि मागच्या काळातील हवामान या आधारावर वातावरणाचे विश्लेषण आणि वाहतुकीला मार्गदर्शन करणे, डासांच्या वाढत्या प्रमाणाचे आकलन करण्यासाठी फैलावाचा पॅटर्न निश्चित करणे आदी. यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या वापरातून समुदायाच्या पातळीवर मधुमेह, फॅटी लीवर आणि हृदयरोग यासारख्या संसर्गजन्य नसलेल्या आजाराची स्थिती कशी राहू शकते याबाबत अंदाज बांधला जावू शकतो. अर्थात या आघाडीवर भारताची जगाबरोबर चालण्याची गती ही संथच आहे.तरीही पीजीआयएमईआर, चंडीगड, एम्स नवी दिल्ली, एशियन इन्स्टिटयूट ऑफ गॅस्ट्रोएट्रोलॉजी हैदराबाद, टाटा मेमोरियल मुंबई यासारख्या प्रमुख रुरुणालयात भारतातील स्थिती केंद्रस्थानी ठेऊन संशोधन सुरू झाले आहे. परंतु आणखी बरेच काम करणे बाकी आहे. संपूर्ण देशात डिजिटल रेकॉर्ड ठेवणे आणि त्यास अपडेट करण्याचे फार मोठे काम आहे. यासाठी मोठी गुंतवणूक करण्याची गरज आहे. भारतात दुर्गम भागात टेलिमेडिसीन सेवा प्रदान करण्याबरोबरच एआय वापर करण्याचा मुख्य उद्देश आजारांना रोखणे, तपासणी आणि देखरेखीवर असायला हवा.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**बुधवार, दिनांक २५ डिसेंबर २०२४.** मार्गशीर्ष कृ. १०, चित्रा, श्री शके १९४६,विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, उत्तरायण, हेमंत ऋतू. ख्रिसमस, नाताळ. भगवान पार्श्वनाथ जयंती, श्री गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी. **नक्षत्र :** चित्रा, योग : अतिगंड, करण : वणिज **सूर्योदय** : स.०६.५० सूर्यास्त : सायं.०५.३७ वा. **राहू काळ : दुपारी : १२:०० ते १:३०**

**दिनविशेष**

▶ख्रसमस. हा दिवस प्रभू येशूचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. ▶१६४२: आयझॅक न्यूटनचा जन्म. ▶१७५८: एडमंड हॅलेने भाकीत केल्याप्रमाणे १८६२ मध्ये दिसलेला धूमकेतू पुन्हा दिसला. त्याला 'हॅलेचा धूमकेतू' हे नांव देण्यात आले. ▶१८६१: पं. मदनमोहन मालवीया यांचा जन्म. ▶१९२२: सुप्रसिद्ध मराठी विज्ञानलेखक श्री. वि. केळकर यांचा जन्म. ▶१९२४: अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म. ▶१९२५: प्रसिद्ध मराठी कवी श्रीनिवास खारकर यांचा जन्म. ▶१९२६: धर्मवीर भारती यांचा जन्म. ▶१९४१: इंग्रज सैन्याने बेनगाझी जिंकून घेतले. भारतीय सैनिकांचा महत्वाचा वाटा होता. ▶१९४९: कायदेपंडीत, शिक्षणतज्ञ हरिसिंग गौर यांचे निधन. ▶१९७७: चार्ली चॅप्लिनचे निधन. ▶१९८१: बालसाहित्यिक व प्रकाशक द. के. बर्वे यांचे निधन. ▶१९९४: भारताचे राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांचे निधन. ▶२००१: दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानांना उतरण्यास मदत करणारी स्वयंचलित यंत्रणा बसविण्यास आली. ती कार्यरत झाली.

**राशीभविष्य**

▲ **मेष :** अनपेक्षित खर्च. ▲ **वृषभ :** खिसा पाकिटं सांभाळा. ▲ **मिथुन :** पैशाची तजवीज होईल. ▲**कर्क :** नवीन व्यक्तीशी मैत्री होईल. ▲ **सिंह :** मनपसंत व्यक्तीचा सहवास.▲ **कन्या :** कमी श्रमात जास्त यश. ▲ **तुळ :** अपेक्षित बातमी समजेल. ▲ **वृश्चिक :** आप्तेष्ट भेटतील. ▲ **धनु :** ठरलेली कामे लांबतील. ▲ **मकर :** कामाचा कंटाळा येईल. ▲ **कुंभ :** नवीन अनुभव घ्याल. ▲ **मीन :** प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**चिंतन**

हत्तीपासून एक हजार फूट दूर रहावे. घोड्यापासून शंभर फूट दूर रहावे. शिंगे असणाऱ्या प्राण्यापासून दहा फूट दूर रहावे. परंतु जेथे दुर्जनांचे वास्तव आहे, तेथून कायमसाठी दूर रहावे.

– उपनिषद

**व्यक्तीविशेष**

### चक्रवर्ती राजगोपालचारी

भारतीय स्वातंत्र्य चवळ्ळीतील थोर नेते आणि स्वातंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालचारी यांचा जन्म १० डिसेंबर १८७८ रोजी तामिळनाडूतील थोरोपल्ली येथे त्यांचा जन्म झाला. वकिली करणारे राजाजी १९१९ मध्ये महात्माजींना भेटले आणि स्वातंत्र्य चळवळीत उतरले. त्यांनी कारावासही भोगला. यंग इंडियाचे संपादनही केले. म. गांधींनी पुरस्कारलेल्या खादीचा प्रसार, जातीय ऐक्य, राष्ट्रीय शिक्षण आणि अस्पृश्यता निवारण या चंतु:सूत्रीचा प्रसार आणि प्रचार त्यांनी आयुष्यभर केला. मद्रास प्रांताचे मुख्यमंत्री, स्वतंत्र पक्षाचे संस्थापक अध्यक्ष, बंगाचे राज्यपाल आणि स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जानरल अशा अनेक पदांवरुन त्यांनी कार्य केले. त्यांच्या या देशकार्याचा गौरव म्हणून भारत सरकाने त्यांना १९५४ मध्ये भारतरत्न देऊन सन्मानिले. पण आज राजगोपलचारींचे स्मरण होते ते त्यांनी घेतलेल्या अण्वस्त्र बंदीच्या भूमिकेमुळे. मूळचे तत्त्वचिंतन असणाऱ्या राजाजींनी रामायण-महाभारताचा तामिळ आणि इंग्रजीत अनुवाद केला आहे. त्यांच्या तामिळ महाभारताला साहित्य अकादमीचा पुरस्कारही लाभला. त्यांचे २५ डिसेंबर १९७२ रोजी निधन झाले.

**बोधकथा**

### अती लोभ धरू नये

एक शिकारी एकदा हरणाची शिकार करण्यासाठी अरण्यात गेला. बराच वेळ फिरल्यानंतर त्याला एक हरीण सापडले. त्याची शिकार घेऊन तो परतीच्या वाटेवर लागला. वाटेत त्याला एक रानडुक्कर दिसले. हरणाला खाली ठेवून शिकाऱ्याने रानडुकराची शिकार केली. पण ती करत असताना शेवटचा प्रतिकार म्हणून रानडुकराने त्याच वेळी प्रचंड गर्जना करत शिकाऱ्याला जोरात धडक दिली. शिकारी खाली पडला आणि डोके आपटून मृत्यूमुखी पडला. थोड्याच वेळात तेथे एक कोल्हा भक्ष्य शोधत आला. त्याला खूप भूक लागली होती. समोर बघतो तो हरिण, शिकारी आणि रानडुक्कर तीन-तीन प्राणी तेथे पडलेले होते. ते बघून कोल्ह्याला अतिशय आनंद झाला. तो मनाशी म्हणाला, अरे वा, आज तर माझे नशीब फार जोरावर आहे. केवढी मोठी मेजवानी आज मला मिळाली आहे. आता या तिघांना मला पोटभर खाता येईल शिवाय, काही दिवस भक्ष्य शोधायचीही गरज पडणार नाही. आपल्याला आता भरपूर मांस खायला मिळेल. आता तर मला खूप भूक लागली आहे, मी कोणापासून सुरूवात करू? असा विचार करताना तो मनाशी म्हणाला, या बाणाला डुकराचे थोडेसे मांस लागले आहे. आधी तेच मांस खाऊ यात नाही तर ते वाया जाईल. असा विचार करत त्याने जोर लावून बाण बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्याच क्षणी तो बाण उडून कोल्ह्याच्या पोटात शिरला आणि कोल्हा तेथेच मरून पडला. एखादी गोष्ट मिळण्याची इच्छा धरावी पण अति लोभ धरणे नाशाला कारणीभूत ठरू शकते.

**जिज्ञासा**

### लंबकाद्वारे कालमापन

सध्या इलेक्ट्रॉनिक घडाळ्यांचा जमाना आहे. परंतु पूर्वीच्या काळी घड्याळे फारशी प्रगत नव्हती. वेळ मोजण्यासाठी बरेचदा सूर्याच्या किरणांचा आणि सावल्यांचा वापर केला जायचा. कालांतराने चावीची घड्याळे आली. लंबकाचे घड्याळ शोधण्याचा किंवा लंबकाद्वारे कालमापन करण्याची पद्धती शोधून काढण्याचा मान गॅलिलिओ या महान शास्त्रज्ञांना जातो. परंतु ज्या काळात जगातील वेगवेगळ्या देशांचा एकमेकांशी फारसा संबंध नव्हता. शास्त्रीय दृष्टीकोन ठेवून स्वतंत्रपणे विचार करणे त्यावेळच्या प्रस्थापितांना मान्य नव्हते. अशाच काळात गॅलेलिओ शास्त्रज्ञाचा जन्म झाला. या इटालियन शास्त्रज्ञांचे वडील लोकरीचे व्यापारी होते. गॅलेलिओंची चौकस बुद्धी आणि निरीक्षण शक्ती लहापणापासून खूपच तरल आणि दांडगी होती. केवळ निरीक्षणच नाही तर निरीक्षणातून निष्कर्ष काढणे ही त्याची आवड होती. (पूर्वार्ध)

**सामान्यज्ञान**

### तैगा प्रदेशातील मनुष्य आणि प्राणीजीवन

अलास्का आणि कॅनडातील रेड इंडियन लोक कॅरिबू आणि रेनडियर यांच्या शिकारीवर उपजीविका करतात. प्राण्याचे मांस व कातडी हेच त्याचे अन्न-वस्त्र आहे. तसेच केसाळ कातडी विकून रोजच्या गरजेच्या वस्तू मिळवणे आणि लाकूडतोड हेही त्यांचे उद्योगधंदे आहेत. ते खालच्या भागात ओढून घेतात आणि त्यापासून कागद, लाकडी, समान व खेळणी आदी वस्तू तयार करतात. कॅनडात हा उद्योग मोठ्या प्रमाणात चालतो. तसेच अलीकडे या प्रदेशात सोने, खनिज तेल, लोखंड, कोळसा, युरेनियम, तांबे, मॅग्नेशियम, निकेल वगैरेंच्या खाणी सापडल्यामुळे औद्योगिक वाढ झाली आहे. (समाप्त)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५४०**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 3 |
| | 4 | | 2 |
| | | 2 | 1 |
| 1 | | | |

**क्रमांक ५३९ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 1 |
| 4 | 1 | 2 | 3 |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 3 | 4 | 1 | 2 |

**हास्यविनोद**

दोन उंदीर बाईकवरून चाललेले असतात. हत्ती त्यांच्याकडे लिफ्ट मागतो. यावर पहिला उंदीर म्हणतो, बघ बाबा, आम्हाला तुला लिफ्ट द्यायला काही प्रॉब्लेम नाही. पण तुझी आई तुला उद्या म्हणेल आजकाल तू गुंडांसोबत का फिरतोस..!

**झंप्या (परमेश्वराला) :** हे परमेश्वरा, माझ्या घरापासून अमेरिकेपर्यंतचा रस्ता मला तयार करून दे.
**परमेश्वर :** कठीण आहे, दुसरे काही तरी माग.
**झंप्या :** मग मला अशी प्रेयसी दे, जी फक्त माझ्यावर आणि माझ्यावरच प्रेम करेल.
**परमेश्वर :** मला सांग, रस्ता केव्हा पासून बनवायला घेऊ?

**महिलायन**

### डिझायनर पडदे

गृहसजावटीत पड्यांना बरेच महत्त्व आहे. कारण पडद्यांमुळे घराचे सौंदर्य फुलते. घराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी पडदे महत्त्वाची भूमिका बजावतात. हल्ली प्रिंटेड पडद्यासोबत गोफ पडते आणि मोत्यांचे पडदेही बाजारात उपलब्ध आहेत. पडद्यांसाठी प्रिंटेड किंवा प्लेन कापडही मिळते. त्यापासून आपल्या आवडत्या डिझाईनमध्ये आपण पडदे शिवून घेऊ शकतो. पडदे शिवण्याच्या अनेक डिझाईन्सचे पर्याय सध्या उपलब्ध आहेत. आपले बजेट लक्षात घेऊन आवडीनुसार डिझाईन निवडावे. वेलवेट, पॉलिएस्टर, क्रश, कॉटन-सिंथेटिक, अशा प्रकारच्या मिक्स मटेरियलमध्येदेखील पडदे उपलब्ध आहेत. दोन वेगवेगळ्या प्लेन आणि डिझाईनच्या कापडाला चौकोणी तुकड्यात कापून आणि त्यांची आकर्ष मांडणी करून, शिवून, वेगळ्या पद्धतीने पडदे आपण बनवून घेऊ शकतो. अर्थात, बाजारात तयार पडदेही उपलब्ध असतात. त्यांचाही वापर आपण करू शकतो. काहींना घरात धूळ येऊ नये म्हणून पडदे हवे असतात तर काहींना जास्त ऊन नको म्हणून हवे असतात. आपली गरज ओळखून पडद्यांची निवड करावी. केवळ सजावटीसाठीही पडद्यांची निवड करता येते. सध्या मोत्यांच्या पडद्यांची चलती अधिक दिसून येते. अतिशय सुंदर, रंगिबेरंगी माळांचा यामध्ये वापर केलेला असतो. (पूर्वार्ध)

**गंमतग्यान**

### पिन कोड म्हणजे काय

मोबाईल, इंटरनेटच्या जमान्यात पत्र पाठवण्याची संख्या कमी झाली असली तरीही आजही पोस्टाद्वारे शहरांपासून खेडोपाड्यांपर्यंत मोठे व्यवहार होत असतात. पोस्टकार्डावर, पाकिटावर पीन कोड टाकण्याची पद्धत आहे. पत्त्याबरोबरच त्या गावाचा पीन कोड टाकणे अत्यावश्यक असते. आपण तो टाकतोही पण हा पीन कोड का टाकायचा असतो ? पीन कोड म्हणजे काय ? असा प्रश्न अनेकदा पडतो. पत्त्याखालील त्या गावाचा सहा अंकी पिन कोड म्हणजे केवळ एक संख्या नसून तो एक महत्त्वाचा संकेत आहे. या संख्येमध्ये भूगोलाची बरीच माहिती समाविष्ट असते. ज्यामुळे पत्रांची विभागणी करताना त्याचा खूप फायदा होतो. पिन कोड म्हणजे पोस्टल इंडेक्स नंबर. याची सुरुवात पोस्ट खात्याने १५ ऑगस्ट १९७२ रोजी केली होती. या अंतर्गत टपाल वितरण करणाऱ्या प्रत्येक प्रमुख विभागाने आपल्या पत्र कार्यालयात सहा अंकांची वेगवेगळी संख्या वितरीत केली आहे. तर या प्रमुख कार्यालयांच्या शाखा आपल्या मूळ कार्यालयातील या संख्यांचा वापर करताना दिसतात. पत्त्याच्या शेवटी लिहिलेली ही संख्या बघून कर्मचारी त्या पत्राचे मूळ वर्गीकरण करतात. भारतासारख्या देशात डझनभर भाषा, बोलीभाषा तसेच हजारो लिपींचा वापर केला जातो. (पूर्वार्ध)

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## उपमुख्यमंत्री अजित पवारांचे निर्देश : भीमअनुयायांची गैरसोय टाळा

# जगाला हेवा वाटेल असे संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ उभारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** श्री क्षेत्र तुळापूर येथील स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ प्राचीन आणि आधुनिकतेचा संगम साधून महाराजांचा गौरवशाली इतिहास जगासमोर येईल तसेच जगाला हेवा वाटेल, अशा स्वरूपात उभारण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे तुळापूर (ता. हवेली) येथील बलिदान स्थळ विकास कामांची त्यांनी पाहणी केली. याप्रसंगी आमदार ज्ञानेश्वर कटके, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता बाप्पा बहीर, कार्यकारी अभियंता अमोल पवार, तुळापूरच्या सरपंच अ‍ॅड. गुंफा इंगळे, वढू बुद्रुकच्या सरपंच अंजली शिंदे आदी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ विकासकामे करताना ऐतिहासिक दृश्यस्वरुपातील आणि दर्जेदार साहित्याचा वापर करावा. विकासकामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील, याकडे लक्ष द्यावे. कोणतीही कामे प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. विकासकामे करताना दगडी कातीव, कोरीव बांधकाम, मातीच्या वैविध्यपूर्ण विटा आदींचा वापर करत बांधकामाला मजबुती येईल अशा पद्धतींचा अवलंब करावा.

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ व समाधी स्थळ स्मारक वढू (बु.) विकास आराखडा अंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील एकूण २६४ कोटी रुपयाच्या कामाबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास शासनस्तरावर बैठक घेऊन त्वरित मंजूरी देण्यात येईल. या कामांचे सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.


कोरेगाव भीमा विजयस्तंभ येथील बैठकीत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार

नदीच्या कडेला बांधकाम करताना नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला कोणताही बाधा येणार नाही यासाठी सर्व पर्यावरणाच्या नियमांचे पालन करावे; तसेच नदीच्या अनुषंगाने लाल रेषा, निळी रेषाबाबतच्या अटींचे काटेकोर पालन करावे. परिसरात अधिकाधिक वृक्षारोपण करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ शौर्यदिन अभिवादन सोहळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या भीमअनुयायांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, सोहळा शांततेत आणि उत्साहात साजरा व्हावा याकरीता सर्व संबंधित विभागांनी उत्तम नियोजन करावे, याकरीता शासनाच्यावतीने निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

अजित पवार म्हणाले, येत्या १ जानेवारी रोजी विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी येणाऱ्या अनुयायांची संख्या लक्षात घेता त्यादृष्टीने सर्व बाबींचे सूक्ष्म नियोजन करावे. गतवर्षीच्यावेळी राहिलेल्या त्रुटींची पूर्तता होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. परिसरात वाहतूक कोंडी होणार नाही याकरीता वाहतूक व्यवस्था, वाहनतळाचा आराखडा तयार करावा, स्वच्छतेसाठी पथकांची नियुक्ती आणि स्वच्छतागृहांसाठी पुरेशा प्रमाणात पाण्याची सुविधा करावी. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची संख्याही विचारात घ्यावी.

पोलीस विभागाने वाहतुकीचे नियोजन करुन कायदा व सुव्यवस्थेबाबत नियोजन करावे. पीएमपीएमएलने पुरेशा बसेसची व्यवस्था करावी. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाने रस्त्यांची डागडुजी करून घ्यावी. अनुयायांची संख्या लक्षात घेऊन सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिकांही सुलभरित्या विजयस्तंभास अभिवादन करता येईल, याबाबत दक्षता घ्यावी. रुग्णवाहिका, प्रथमोपचार पेटी पुरेशा प्रमाणात ठेवाव्यात. एकंदरीत अभिवादन सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागाने समन्वयाने कामे करावीत, अशाही सूचना अजित पवार यांनी दिल्या.

# शासकीय विभागांची प्रत्येक पंधरा दिवसाला आढावा बैठक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** आंबेगाव तालुक्यात बांधकाम, पाणीपुरवठा, मंचर व घोडेगाव रुग्णालय, तालुकाआरोग्य विभाग, लघुपाटबंधारे, शिक्षण, मंचर नगरपरिषद, पशुसंवर्धन आदी आता प्रत्येक पंधरा दिवसांत विभागनिहाय आढावा बैठक होईल. यामध्ये झालेल्या निर्णयांचा आढावा पुढील बैठकीत घेतला जाईल. यासाठी आश्वासन देताना व माहिती सांगताना जबाबदारीने सांगा, अशा सूचना वळसे-पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



घोडेगाव येथिल हुतात्मा बाबू गेणू सभागृहात विविध शासकीय विभागांच्या आढावा बैठकीत बोलताना आमदार दिलीप वळसे पाटील.

आंबेगाव तालुक्यातील विविध शासकीय विभागांची आढावा बैठक घोडेगाव येथील पंचायत समिती हुतात्मा बाबू गेणू सभागृहात आमदार दिलीप वळसे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी प्रांताधिकारी गोविंद शिंदे, तहसीलदार संजय नागटिळक, गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई, कार्यकारी अभियंता एस. एम. बांगर, माजी सभापती सुभाष मोरमारे, संजय गवारी, नंदकुमार सोनावळे, माउली घोडेकर आदी उपस्थित होते.


आंबेगाव तालुक्यात पायाभूत सुविधांची कामे भरपूर झाली आहेत; पण वैयक्तिक लाभाच्या योजनांकडे शासकीय यंत्रणा पाहत नाहीत. यातील पाणंद रस्ते योजना ही योजना तालुक्यात प्रभावीपणे राबवली जाऊ शकते, यासाठी सर्वांनी मिळून काम करा, अशा सूचना माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिल्या.

यावेळी कातकरी, ठाकर पारधी समाजाच्या कामांकडे विशेष लक्ष द्या, येणाऱ्या उन्हाळ्यात तलाव योजना राबवून बंधारे, धरण यातील मोठ्या प्रमाणात वाळूची कामे घेतली जावीत, यातील माती शेतकऱ्यांना हवी असेल तर ती देण्याची व्यवस्था करावी. तसेच विविध विभागांचे शासनाकडे प्रलंबित असलेले प्रश्न कळवावेत, याचा पाठपुरावा करून ही कामे पूर्ण केली जातील. नगरपंचायत हद्दीत नव्याने दवाखाना करण्यासाठी प्रस्ताव तयार करा, यासाठीदेखील शासनाकडे प्रयत्न करू, असे वळसे- पाटील यांनी सांगितले.

# पिंपळवंडीत पिंजऱ्यात बिबट्या अडकला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव:** जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथील तोतर मळ्यातील वसंत विठ्ठल ठोकले यांच्या शेतामध्ये बिबट्याला पकडण्यासाठी वन खात्याने लावलेल्या पिंजऱ्यात मंगळवारी बिबट्या अडकला असल्याची माहिती ओतूर विभागाचे वनक्षेत्रपाल लहू ठोकळ यांनी दिली. पकडलेला बिबट्या सुमारे तीन वर्षाचा असून त्याला माणिकडोह येथील बिबट निवाराकेंद्रात ठेवण्यात आले आहे.



ठोकळ म्हणाले की, तोतरबेट येथील प्रवीण पंढरीनाथ काकडे या स्थानिक शेतकऱ्याने परिसरामध्ये बिबट्या असल्याचे वनविभागाला कळविले होते. तसेच बाजूला शाळा असल्यामुळे व दररोज सायंकाळी बिबट्या या ठिकाणाहून ये - जा करीत असल्याचे आम्ही स्वतः पाहिले असल्याचे त्यांनी सांगितल्याने वनविभाग आणि त्या ठिकाणी तातडीने तीन दिवसांपूर्वी पिंजरा लावला होता. या पिंजऱ्यामध्ये बिबट्याला भक्ष म्हणून कोंबडी देखील ठेवण्यात आली होती. मंगळवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास हा बिबट्या पिंजऱ्यामध्ये अडकला असून त्याला माणिकडोह येथील निवारा केंद्रात हालविण्यात आले आहे.

दरम्यान, या परिसरामध्ये अद्यापही चार ते पाच बिबटे असून ओळख हाताने पुन्हा या ठिकाणी पिंजरा लावावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांची आहे. तसेच पकडलेले बिबटे इतरत्र सोडून न देता या बिबट्यांची नसबंदी करावी अन्यथा हे सगळे बिबटे ताडोबा सारख्या जंगलामध्ये नेऊन ठेवावेत अशी मागणी प्रवीण पंढरीनाथ काकडे यांनी केली आहे.

वनक्षेत्रपाल लहू ठोकळ म्हणाले की, या परिसरामध्ये जर बिबट्या अद्यापही असेल तर पुन्हा वनविभाग येथे पिंजरा लावील. सध्या उसाची तोडणी सुरू असल्याने बिबट्या इतरत्र सैरभैर झाल्याचे दिसून येत आहे. शाळकरी मुलांबरोबर शेतामध्ये काम करत असलेल्या लोकांनी याबाबतची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

## एसी वाहतूक करणाऱ्या कंटेनरला आग

**दौंड :** एसी वाहतूक करणाऱ्या कंटेनरला यवत येथील पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल साळुंखे मिसळ समोर भिषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेत कंटेनरमधील एकाचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी पहाटे घडली. मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर पुणे महामार्गावरून चेन्नई येथून एसी भरलेला कंटेनर हा भिवंडीकडे निघाला होता. त्यावेळी यवत परिसरात कंटेनरला अचानक आग लागल्याचे चालकाच्या लक्षात आले. चालकाने क्लीनरला उठवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो झोपेत असल्याने उठला नाही. कंटेनर चालकाने उडी मारून स्वतःचा जीव वाचवला. मात्र क्लीनरला बाहेर पडता न आल्याने त्याचा जळून मृत्यू झाला.

# जिल्हा परिषद शाळेत भरला आठवडे बाजार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील बेल्हे नंबर १ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंददायी रविवार उपक्रमांतर्गत आनंदी आठवडा बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.

बेल्हे हे गाव आठवडा बाजारासाठी प्रसिद्ध गाव आहे. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांना बाजारातील व्यवहाराचे खूप चांगले ज्ञान आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद शाळेमध्ये आनंदी आठवड्या बाजाराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मुलांनी मेथी, पालक, भोपळा, मिरची, वांगी, भेंडी असा अनेक प्रकारचा भाजीपाला विक्रीसाठी आणला होता. त्यासोबत विविध प्रकारची फळे, खाऊ गल्ली, कडधान्य, किरकोळ विक्रीच्या वस्तू बाजारामध्ये आणल्या होत्या. पालकांनी बाजाराला उत्कृष्ट प्रतिसाद देत आनंदी बाजारामध्ये सहभाग घेत बाजारात खरेदी केली. सर्वांच्या सहकार्यामुळे बाजारामध्ये २० हजार रुपयांची उलाढाल झाली.

इतर वेळी आपल्या आई वडिलांबरोबर बाजार आणण्यासाठी जाणारे बालचमु आज स्वतः वस्तूंची देवाण-घेवाण करत होते व व्यवस्थित पैशाचा हिशोब करत होते हे पाहून शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांनी, पालकांनी समाधान व्यक्त केले. शाळेच्या मुख्याध्यापिका मीरा बेलकर, उपशिक्षिक हरिदास घोडे, संतोष डुकरे, सुवर्णा गाढवे, कविता सहाणे, प्रविणा नाईकवाडी, योगिता जाधव, यांनी नियोजन केले होते.

# आमदार बाबाजी काळे, आमदार बापूसाहेब पठारे यांना आळंदीत मानपत्र प्रदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** ओळख श्री ज्ञानेश्वरी - एक परिवार आणि श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती, आळंदी यांचे वतीने वडगावशेरी विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार बापूसाहेब पठारे, खेड आळंदी विधानसभेचे नवनिर्वाचित शिवसेनेचे आमदार बाबाजी काळे (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांचा आळंदीत जाहीर सत्कार करीत मानपत्र प्रदान सोहळा उत्साहात साजरा झाला. ओळख श्री ज्ञानेश्वरी - एक परिवार समिती, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती यांचे वतीने मानपत्र प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष स्थानी ह. भ. प. शंकर महाराज पांचाळ गुरुजी होते.



या प्रसंगी श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष प्रकाश काळे, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर, खजिनदार डॉ.श्री ज्ञानेश्वर पाटील, शिरूर उपसंघटक अनिता झुजम, माजी नगरसेवक आनंद मुंगसे, उत्तमराव गोगावले, संजय वडगावकर, तुकाराम अण्णा गवारी, नंदकुमार वडगावकर, अ‍ॅड विष्णू तापकीर, अर्जुन मेदनकर, विलासराव वाघमारे, तानाजी चौधरी, चंद्रकांत गोरे, ज्ञानेश्वर जाधव, श्रीधर सरनाईक, पुरुषोत्तम महाराज हिंगणकर, राजेंद्र जाधव, सोपान काळे, सुरेश चौधरी, रमेश चौधरी, विलास कुऱ्हाडे, मंगेश तीताडे, धनाजी काळे, कैलास अव्हाळे, विश्वंभर पाटील, निर्मला चव्हाण, प्राजक्ता भोसले, ताई महाराज मानकर संध्याताई काळे, संगीता पाटील, माजी उपाध्यक्ष विलास घुंडरे पाटील, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर घुंडरे पाटील, ओळख श्री ज्ञानेश्वरी एक परिवार अंतर्गत विविध शाळांत पाठ घेणारे अध्यापक साधक महाराज अध्यापक यांचेसह शिक्षण संस्था चालक, वारकरी महिला मंडळाचे पदाधिकारी साधक, यांचेसह आळंदी ग्रामस्थ पदाधिकारी, भाविक, वारकरी उपस्थित होते.

या सन्मान व मानपत्र प्रदान सोहळ्याचे आयोजन श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती व ओळख श्री ज्ञानेश्वरी एक परिवार सर्व घटक संस्था यांच्या वतीने कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. श्री ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विष्णू तापकीर, अनिताताई झुजम यांच्या सह विविध सेवाभावी संस्था, व्यक्ती मान्यवर यांनी नवनिर्वाचित आमदार बापूसाहेब पठारे, आमदार बाबाजी काळे यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे यशस्वीते साठी श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीच्या वतीने विशेष परिश्रम घेण्यात आले. प्रास्ताविक समितीचे अध्यक्ष प्रकाश तात्या काळे यांनी केले. डॉ. सुरेंद्र हेरकळ यांनी मानपत्र वाचन व सूत्रसंचलन केले. आभार भागवत काटकर यांनी मानले.

## » Selected

## दिशा अकॅडमीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान




**बारामती:** दिशा अकॅडमीने सुपर-३० बॅच अंतर्गत निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा बारामती येथील कविवर्य मोरोपंत नाट्य मंदिरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद्मश्री आनंद कुमार, संस्थापक, सुपर-३० (पटना, बिहार) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आत्मविश्वास आणि प्रामाणिक प्रयत्नांनी यशस्वी होण्याचा मूलमंत्र दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अरुण कुमार सिन्हा, शास्त्रज्ञ इस्रो, यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशसेवा करण्याची प्रेरणा दिली.

प्रमुख उपस्थित मान्यवरांमध्ये विजय पवार - महाराष्ट्र प्रोफेशनल टिचर्स असोसिएशन, प्रा. डॉ. दिलीप देशमुख-शास्त्र विभाग प्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे तसेच विविध कोचिंग सेंटरचे संस्थापक, शिक्षक व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश होता. या सोहळ्यात डी-एसएटी परीक्षेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विशेष सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सुपर ३० बॅच साठी निवड होण्यासाठी आणि स्कॉलरशीप मिळविण्याची संधी १० वीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अजूनही उपलब्ध असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात या संधीची फायदा करून घ्यावा असे आवाहन प्रा. डॉ. नितीन कदम यांनी केले आहे.

## दौंड तालुक्यात कांदा लागवड मोठ्या प्रमाणात सुरू



**पारगाव :** दौंड तालुक्यातील भीमा नदीपट्ट्यातील बागायती भागात कांदा लागवडीच्या कामांना मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली आहे.

सध्या थंडी सुरू असल्याने बळीराजा कांद्याच्या लागवडी चांगलाच वळलेला आहे. चालू वर्षी कांद्याला चांगला भाव मिळाल्याने यावर्षी शेतकऱ्यांनी कांदा लागवडीकडे वळले आहेत. कारखाने जोरदार सुरू असल्याने ऊसतोड झाल्यानंतर ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेताची मशागत करून कांदा लागवडीसाठी सारा पद्धतीचा वापर केला आहे. एकीकडे थंडी वाढू लागली असून,वातावरणात बदल घडताना दिसत आहे तरी शेतकऱ्यांनी महागडे बियाणे घेऊन आपल्याच शेतात रूप तयार करून ती लागवडीसाठी उपलब्ध केली आहेत. मजुरांना कांदा लागवडीसाठी वाढता भाव देऊन कांदा लागवड मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

## शिक्षण पतसंस्थेच्या अध्यक्षपदी निचित

**शिरूर:** शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी शर्मिला अर्जुन निचित यांची बिनविरोध निवड झाली. मानद सचिवपदी विजय गोडसे आणि खजिनदारपदी अंजली संपत शिंदे यांची निवड झाली. निवडीनंतर सहकार पॅनलतर्फे नवनिर्वाचित पदाधिकारी यांना सन्मानित करण्यात आले. नूतन मानद सचिव विजय गोडसे यांनी संस्थेच्या आर्थिक परिस्थितीचा लेखाजोखा मांडला. पतसंस्थेवरील विश्वासामुळे सभासदांनी ११६ कोटी ठेवी आजपर्यंत ठेवल्या असून पुढील काळात ठेवी वाढवून पतसंस्था स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## विना लायसन, फॅन्सी नंबर प्लेट, लावलेल्या वाहनांवर कारवाई केल्याने त्रस्त नागरिकांनी व्यक्त केले समाधान

# नीरेत बेशिस्त पार्कींग केलेल्या वाहनांवर पोलिसांनी केली दंडात्मक कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा येथील बारामती रोडवरील मुख्य बाजारपेठेतील बेशिस्त पार्किंग केलेल्या वाहनांवर जेजुरी पोलिसांनी सोमवारी (दि.२३) दंडात्मक कारवाई केली. तसेच विना लायसन, मोबाईलवर बोलत वाहन चालविणे, फॅन्सी नंबर प्लेट, चारचाकींना काळ्या फिल्मींग लावलेल्या वाहनांवर कारवाई केल्याने त्रस्त नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

नीरा येथील बारामती रोडवरील मुख्य बाजारपेठेतील अहिल्यादेवी होळकर चौकाच्या परिसरात अनेक बँका, पतसंस्था तसेच उद्योग व्यवसाय असल्याने सर्वसामान्य नागरिकांसह व्यापारी, महिला यांची बँकेत व खरेदीसाठी दुकानात तर शाळा,महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर नेहमीच वर्दळ असते. त्यावेळी बाजारपेठेत अनेक दुचाकी व चारचाकी वाहन चालक रस्त्यावरच बेशिस्त पार्किंग करून वाहतुकीला अडथळा निर्माण करीत असतात. तसेच बेशिस्त पार्किंगमुळे वाहन चालकांमध्ये तु तू मैं मैं होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. यांचे पर्यावसान भांडणात ही झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. याबाबत नागरिकांसह व्यावसाईकांच्या अनेक तक्रारी ग्रामपंचायत व पोलिस प्रशासनाकडे आहेत.

नीरा येथील बारामती रोडवरील बाजारपेठेतील बेशिस्त पार्किंगवर सोमवारी (दि. २३) सकाळी जेजुरीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक वाकचौरे यांच्या नेतृत्वाखाली जेजुरी पोलीस व नीरा पोलिसांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बुवासाहेब महाराज चौका दरम्यानच्या बेशिस्त पार्कींग केलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. फुटपाथ व रस्त्यावरील अतिक्रमणधारकांना सुचना करत, आपला व्यावसाय फुटपाथच्या मागे करण्याची विनंती केली. त्यानंतर वाहनांची जास्त रहदारी असलेल्या अहिल्यादेवी होळकर चौकात नियमबाह्य व धोकादायक पद्धतीने वाहन चालवणाऱ्या वाहनचालकांवर ऑनलाईन पद्धतीने दंडात्मक कारवाई केली.


नीरा (ता. पुरंदर) येथील मुख्य बाजारपेठेत बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करताना पोलिस कर्मचारी.

### नीरेत १ लाख २७ हजार रूपयांची दंडात्मक कारवाई

● नीरा येथील बाजारपेठेत ट्रिपल सीट, विना लायसन्स, ब्लॅक फिल्मींग, फोनवर बोलताना वाहन चालवणे यांसारख्या रस्त्यावरील अपघातास कारणीभूत असलेल्या १०३ वाहन चालकांवर कारवाई करीत तब्बल १ लाख २७ हजार ५०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती फौजदार सर्जेराव पुजारी यांनी दिली .

“ नीरा येथील बाजारपेठेत बेशिस्तपणे दुचाकी व चारचाकी वाहने पार्कींग केली जात असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. या पार्श्वभूमीवरसोमवारी कारवाई करण्यात आली आहे. यापुढे दररोज अशी कारवाई केली जाईल. वाहनचालकांनी सुरक्षित ठिकाणी वाहने पार्कींग करावीत, तसेच फुटापाथवर अतिक्रमणे करु नयेत अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल


— दिपक वाकचौरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, जेजूरी



# मानसी

• फॅशन • किचन • गृहसजावट • सहजीवन • टिप्स

# एकांताची सावली!



**निसर्गात शोधतांना झाडांमधले ऋतूमानाप्रमाणे होणारे बदल अगदी सूक्ष्म असतात. पर्वत शिखरांवर सुखद एकांत असतो. ते कधी केविलवाणे, बापुडवाणे दिसत नाहीत. कारण त्यांना एकाकीपणाची भिती वाटत नाही. ते स्वत:त मग्न असतात. सोबतीची अपेक्षा नसते. आपणही निसर्गाचा एक भाग आहोत. अधिक प्रगत, अधिक सजग. विचार करण्याची शक्ती असलेली आहोत. एकटे आहोत असं न मानता स्वत:ची सोबत स्वत:ला करावी.**

कसा असतो एकांत शांत हवाहवासा! आत्मानंदी लीन होणारा! एकाकी एकटेपणा. पूर्वीच्या काळी ऋषीमुनी एकांतात साधना करायचे. विजनवासी व्हायचे. लौकिकबाह्य जगाशी संबंध सोडून एकांतात जायचे. आपणही पाहतो, निसर्गात जिथे उंची आहे तिथे एकांत असतो. प्रवासात ट्रेनच्या खिडक्यांमधून डोंगररांगा निरखत जातो तेव्हा असं वाटतं किती युगं लोटली हे पर्वत स्तब्ध आहेत... एकांतात मौनात आहेत ! किती इतिहास यांनी पाहिला असेल? किती दशकं, सहस्त्रकं यांनी निरखली असतील?... ते बोलू लागले तर? पण आजतागायत पर्वत बोलले, नद्या बोलल्या, जंगलं बोलतीत असं ऐकिवात नाही. कदाचित त्यांचं मौन हीच त्याची भाषा असेल.

ऋतुगणिक बदलणारी त्यावरील आवरणं ही त्यांची देहबोली त्यातून हे बोलत असतील का? त्यांची भाषा समजावून घेण्यास आपण तर कमी पडत नाही ना? त्यांच्याशी संवाद साधायला? ध्यानधारणेत एकांताला फार मोलाचे स्थान आहे. तुम्ही मौनस्त रहा, तुमच्या प्राणशक्तीत वाढ होते. तुमच्या वाणीला देवत्वाचा स्पर्श होऊन ती खरेपणाच्या कसोटीवर उतरते. ध्यानधारणेसाठी एकांताची आवश्यकता असते असं म्हणता येईल की एकांत ध्यानधारणेतील एव्हरेस्ट शिखर आहे? अत्युच्च उत्कट बिंदू गाठण्यासाठी प्रचंड मेहनत, शारीरिक कष्ट याची गरज नव्हे तर निकड असते. एव्हरेस्ट शिखरावर पोहोचणं सहजी सोपं नाही; महत्प्रयासानं ते गाठता येतं. तसं काहीसं एकांताचं आहे.

एकांत हा तुमच्यात असतो. पण सहसा तो सापडत नाही. बाह्य कोलाहलापेक्षा अंतर्गत कोलाहल, शातंवला की झालं तो मिळतो. पण आतंरिक कोलाहल, विचारांची धुमश्चक्री, भल्याबुऱ्या कल्पना हे सारं मनाआड टाकणं आणि मन शातंवत त्याला एकांतात नेणं ही एव्हरेस्ट शिखर सर करण्याइतकं कठीण आहे.

मुख्य अडचण हीच आहे की, आपण एकाकीपणाला घाबरतो. एकटं राहायला पाहत नाही. सतत कोणाची तरी सोबत शोधत असतो. या सोबतीच्या हव्यासासाठी बरेचदा अतिनुकसान सोसतो. निरनिराळी नाती, मैत्री शोधतो. समाजात संस्था स्थापन करतो. अनेक उचापत्या करतो. येनकेनप्रकारे आपण आपला एकाकीपणा, एकटेपणा घालविण्याच्या प्रयत्नात असतो. अशा वेळी इतर जण आपल्याला 'व्वा,काय सोशल व्यक्तिमत्व आहे' अशा प्रकारे वाखाणतात. आतली गोम काही निराळीच असते.

वर सांगितल्याप्रमाणे मनाच्या मुळाशी एकटेपणाची भिती असते. अशी कितीतरी माणसं आपल्या भोवताली आजूबाजूला आपण बघतो की जी स्वत:शी बोलतात, मोठमोठ्यांदा गाणी म्हणतात, ते स्वत:चा एकटेपणा विसरण्याचा प्रयत्न करतात. हीच मानसिकता टाळण्यासाठी आपण इतरांना जवळ करतो. अनेक नाती निर्माण करतो. गंमत अशी की, जशी आपली गरज असते तसेच समोरच्याची पण मानसिकता आणि गरज असते. मग नात्याचे आणि मैत्रीचे बंध तयार होतात. त्याला प्रेम असे म्हणले जाते. ती पण एक फसगतच असते. बरेचदा त्यात प्रेमाचा लवलेश नसून एकाकीपणा दुर करण्याचा केविलवाणा प्रयत्न असतो. स्वत:पासून दूर पळत जाऊन दुसऱ्या कोणाचा आधार घेत राहतो. पण तिथेही निराशा असते. कारण समोरचादेखील आपला एकाकीपणा दूर करण्यासाठी आलेला असतो. या नात्यातील फोलत्व लक्षात येत तेव्हा पाणी डोक्यावरून गेलेले असते.

तुमचा एकाकीपणा हा सावलीसारखा असतो. दिवसाच्या प्रकाशात आपली सावली आपल्याला दिसत नाही; पण ती २४ तास बिलगुन असते. जशी सावली सुटत नाही तसा एकाकीपणा सुटत नाही. कितीही नात्याचे रेशीमबंध बांधले तरी ते तुमची साथ सोडून जातातच. शेवटी स्वत:जवळ आपल्याला परतावं लागतं, हे ज्याक्षणी ध्यानात येईल तो क्षण सौख्याचा... एकाकी एकटेपणापासून सुख:द एकांतात प्रवेशण्याचा... एकांत आता एकटेपणा सोडून सुखाच्या शोधासाठी सज्ज झाला. स्वत:पासून दूर पळण्यापेक्षा डोळे मिटून स्वत:त डोकवा. आत संपूर्ण शांती आणि सुखद एकांत मिळेल. काळीभोर रात्र संपून पहाटेची सोनेरी किरणं दिसतील. एकटेपणा हा आपला स्वभावधर्म आहे. जन्मतो तो एकटा, मरतानाही एकटाच असतो. मग अशा वेळी एकटेपणाची भीती का बाळगायची?

एकटं आणि एकाकी यात फरक आहे. आपण स्वत:साठी पुरेसे आहोत असे समजूया. सर्जनशील बना. आनंदाने गाणी गा. स्वत:साठी वेळ काढा. आतापर्यंत निरनिराळ्या नात्यांमध्ये स्वत:ला जे जखडून टाकलेलं आहे ते मुक्त करा. असं झालं तर तुमची जुन्या दुख:द आठवणीतून सुटका होईल. झाडावरच्या वाळक्या गळणाऱ्या पानांप्रमाणे त्या तुमच्यातून कधी गळून गेल्या हेही कधी कळणार नाही. एकटेपणात कणखरता आहे ती स्विकारा पुढे चला.

आयुष्य सुखाचे होईल. स्वत:ची मानसिक शक्ती स्वत:वर खर्च करून सुखद एकांताचे अनिभिषिक्त राजे बना. आपल्या सुखद एकांताच्या अनुभवाने समृध्द बना. शेवटी प्रत्येक घटना, गोष्ट परिवर्तनीय आहे. आज आहे ते उद्या राहणार नाही हे सत्य स्विकारा. याचा अर्थ असा नाही की समाजात मिसळू नये; तर स्वत:शी रमणारी राहणारी व्यक्ती समाजात उत्कटपणे मिसळते, आपले जीवन समाजाभिमुख करते; कारण ती चारचौघात जरी असली, हसत बोलत असली तरी ती स्वत:मध्ये मग्न असते. सुखद एकांताच्या अत्युच्च शिखरावर विराजमान असते.

**– अरुणा सरनाईक**

■ सेलीब्रेटी कॉर्नर



# सिल्क स्मितांवर बायोपिक येतोय...

साऊथ सिनेमात बोल्ड भूमिकांमुळे चर्चेत असलेली अभिनेत्री सिल्क स्मिताच्या आयुष्यावर आधारित एका सिनेमाची घोषणा करण्यात आली आहे. हा तिचा बायोपिक असणार आहे. यापूर्वी 'द डर्टी पिक्चर' हा चित्रपट सिल्क स्मिताच्या आयुष्यावर होता. ज्यात विद्या बालन मुख्यभूमिकेत होती. तर नसीरुद्दीन शाह, इमरान हाश्मी, तुषार कपूर यांच्या प्रमुख भूमिका होत्या. २०११ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरला होता.

डिसेंबरमध्ये साउथ फिल्म इंडस्ट्रीची क्वीन सिल्क स्मिताच्या जयंतीला अभिनेत्रीच्या आयुष्यावर आधारीत बायोपिक फिल्मची घोषणा करण्यात आली. अभिनेत्री चंद्रिका रावने या बायोपिकचा टीझर शेअर केला. सुरुवातीला तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधींकडे मॅगझीन आणि वृत्तपत्र येतात. त्यामध्ये प्रत्येक ठिकाणी सिल्क स्मिताच्या बातम्या आलेल्या असतात. इंदिराजी आपल्या पीएला ही कोण आहे असं विचारतात? तेव्हा तो म्हणतो, तुम्ही आयर्न लेडी आहात तर ही मॅग्नेटिक लेडी आहे, असे या टीझरमध्ये दिसते.

कोण आहे सिल्क स्मिता ?

सिल्क स्मिताचा जन्म एलुरु (आंध्र प्रदेश) येथे झाला. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. घरची परिस्थिती बिकट असल्यामुळे स्मिता फक्त चौथीपर्यंत शिकल्या. पण आपल्या १७ वर्षांच्या फिल्मी करिअरमध्ये पाच भाषांमध्ये ४५० चित्रपट केले होते. त्यांचे खरे नाव विजयालक्ष्मी विदलपती होते. १९७८ मध्ये 'बेदी' या कन्नड सिनेमातून त्यांनी आपल्या फिल्मी करिअरला सुरुवात केली.

१९७८ मध्ये आलेल्या 'वंदी चक्र' या तमिळ सिनेमात रेशमची भूमिका साकारून स्मिता प्रसिद्धी झोतात आल्या. त्यानंतर या अभिनेत्रीने कधीच मागे वळून पाहिलं नाही. सिल्क यांच्यासोबत काम करण्यासाठी दिग्दर्शक आणि निर्मात्यांची रांग लागू लागली. सिल्क स्मिता यांना प्रोफेशनल आयुष्यामध्ये प्रचंड यश मिळालं. पण खासगी आयुष्यात मात्र त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. सिल्क स्मिता यांनी जेव्हा स्वतःला संपवलं, तेव्हा सिनेविश्वात खळबळ माजली होती. अखेरचा श्वास घेत असताना देखील त्यांच्या जवळ कोणीच नव्हतं

■ स्मरण

# बाया कर्वे



आनंदीबाई धोंडो कर्वे ऊर्फ बाया कर्वे या मराठी सामाजिक–शैक्षणिक कार्यकर्त्या होत्या. मराठी शिक्षणप्रसारक धोंडो केशव कर्वे हे त्यांचे पती होते. त्यांचा जन्म १८६६ मध्ये मुंबईच्या दक्षिणेकडील किनारपट्टीच्या गावात झाला. आनंदीबाईंचे वयाच्या आठव्या वर्षीच लग्न झाले होते, परंतु काही महिन्यांतच त्या विधवा झाल्या. काही वर्षांनी त्यांच्या भावाने त्यांना मुंबईत समाजसुधारक पंडिता रमाबाई यांच्या नवीन शारदा सदन शाळेत दाखल केले. त्या शाळेतील ती पहिली विधवा विद्यार्थिनी होती. पुढे धोंडो केशव कर्वे यांच्याशी केलेल्या पुनर्विवाहानंतर मात्र समाजात खळबळ उडाली. या दाम्पत्याला आणि त्यांच्या कुटुंबाला त्यांच्या गावातून बहिष्कृत करण्यात आले.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिलांसाठी शाळा व महाविद्यालयही सुरू केले. १९१६ मध्ये पुण्यातील हिंगण्यात श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ स्थापन केले. ते महिलांचे भारतातील पहिले विद्यापीठ समजले जाते. आज विद्यापीठाचे मुख्यालय दक्षिण मुंबईत आहे. जुहूला आणखी एक शाखा, पुण्यातील कर्वे रोडवर एक आणि रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथे एक शाखा आहे. आनंदीबाईंनी मिडवाइफरीत डिप्लोमा केला. त्यानंतर पतीचे आत्मचरित्र असलेले आत्मवृत्त हे पुस्तक विकण्यासाठी संपूर्ण देशभर प्रवास केला. या पुस्तकाचे 'लुकिंग बॅक' नावाने भाषांतर केले गेले आहे.

आनंदीबाईंनी विधवांच्या घरांसाठीही निधी गोळा केला. 'माझे पुराण' नावाने आनंदीबाईंनीही आत्मचरित्र लिहिले. ते १९४४ मध्ये प्रकाशित झाले. त्यांच्या स्मृत्यर्थ २००४ मध्ये महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत बाया कर्वे महिला अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली. २९ नोव्हेंबर १९५० रोजी आनंदीबाई यांचे निधन झाले.

# पोशाखातील नाविन्य



पूर्वी विवाहसमारंभासारख्या कार्यक्रमांना पारंपरिक पेहरावांना पसंती मिळत असे. तथापि, आता बदलत्या काळात पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देण्याचा प्रयत्न होताना दिसतो. यातूनच परंपरा आणि नाविन्य याचा सुरेख संगम असणारे फॅशनेबल कपडे बाजारात आले आहेत. मिडी, मॅक्सी, बेलबॉटम, पंजाबी ड्रेस, चुडीदार फॅशनप्रवाहात बराच काळ मागे राहिलेली फॅशन लॉंग स्कर्टच्या रुपाने पुन्हा एकदा चालू प्रवाहात आली.


• लॉंग स्कर्टचे रुप, पोत, स्टाईल भलेही वेगळी असली तरी कन्सेप्ट आपल्या पोलकं आणि परकरशी जुळणारी अशीच. म्हणजे फॅशन पुन्हा पुन्हा फिरुन येतेय....!

• त्यानंतर यालाचा साम्य असलेले हल्लीचे पोशाख म्हणजे चनियाचोळी, लांचा, शरारा हे प्रकार. परंतु या पोषाखाची नजाकत खऱ्या अर्थाने खुलते ते जरदोसी वर्कनेच. वर्कच्या कमी–अधिक प्रमाणानुसार मरगंडी, जॉर्जेट, अमेरिकन जॉर्जेट, मलई सिल्क असे वेगवेगळे कापडाचे प्रकार वापरले जातात.

• वर्कचे ड्रेस गोल्डन, मरुन, मोरपंखी, पोपटी लाल अशा रंगांमध्ये विशेष करुन खुलत असले तरी ऑफ व्हाईट, बेबी पिंक, स्काय ब्ल्यू, राणी कलर अशा कोणत्याही शेडमध्ये हे ड्रेसेस सुंदर दिसतात.

• कापडाचा प्रकार आणि वर्कच्या प्रमाणानुसार हजार–बाराशेपासून १५ ते २० हजारांपर्यंत या ड्रेसेसच्या किंमती असतात. वेगवेगळ्या सामाजिक परंपरानुसार लग्नासाठी महावस्त्र म्हणून शालू, पैठणी किंवा रेशमी साड्यांची खरेदी होत असली तरी रिसेप्शनसाठी मात्र नववधूला असाच पेहराव हवा. हल्ली नववधूसाठीसुध्दा शालू, पैठणीपेक्षा शरारा, लांचा किंवा वर्क केलेले पंजाबी वापरले जातात.

# मुरुमांनी हैराण आहात?



मुरुमांमुळे त्वा खडबडीत होते. सौंदर्यावर त्यामुळे डाग पडतो. चारचौघात जाणेही त्रासदायक वाटते. मुरुम कोणत्याही वयात होऊ शकतात. तेलकटत्वचेच्या लोकांना मुरुमाचा त्रास जास्त होतो. त्यातही उन्हाळ्यात याचे प्रमाण आणखी वाढते. मुरुम कमी करण्याचा प्रयत्न केल्यास ते वाढतातही. म्हणूनच खाली दिलेल्या काही टिप्सचा अवलंब केल्यास मुरुमांना पळवणे सोपे जाईल.

• गुलाबपाणी आणि कापूर यांचे मिश्रण एका बाटलीत भरुन फ्रीजमध्ये ठेवून द्या. मुरुम जेव्हा होतील, त्यावेळी कापसाने हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. हे केल्याने नक्कीच मुरुम कमी होतील.

• संपूर्ण चेहऱ्यावर मुरुम पसरले असतील तर हळद आणि कडुलिंबाची पाने एकत्रित वाटून त्याची पेस्ट तयार करा आणि चेहऱ्यावर लावा. त्याने चेहरा स्वच्छ होईल. कारण लिंबाची पाने रोगप्रतिकारक असतात.

• उन्हाळ्यात त्वचा तेलकट होते. प्रदुषणामुळे चेहरा काळा पडतो व नियमीतपणे साफ न झाल्यामुळे मुरुमं होतात. चेहऱ्याला स्वच्छ ठेवण्यासाठी बेसनपीठात काकडीचा रस टाकून पेस्ट बनवून चेहऱ्याला लावल्याने चेहरा साफ व स्वच्छ होतो. हा फेस पॅकचे काम करतो.

• मुलतानी माती पाण्यात टाकून तिची पेस्ट बनवा. नंतर ती चेहऱ्यावर लावा. मुलतानी मातीला दह्यात मिसळूनही लावू शकतो. मुरुमांवर हाही एक जालीम उपाय आहे.

• गरम पाण्यात हळद टाकून वाफ घेतल्याने चेहऱ्यावरील छिद्रे खुली होतात आणि चेहरा साफ होतो. मुरुम व्हायला त्यामुळे अटकाव होतो.

• तुळस व लिंबाच्या पानाची पेस्ट चेहऱ्यावर लावल्याने मुरुम होत नाहीत.

• पाण्यात चंदनाची पावडर टाकून चेहऱ्याला लावल्यास थंडावा मिळतो व चेहऱ्यावर तेज येते.

• गुलाबाच्या पाकळ्याची पेस्ट बनवून चेहऱ्यावर लावल्याने मुरुमे कमी होतात.

# सडपातळ बनताना...

**सध्याच्या काळात वाढता स्थूलपणा, लठ्ठपणा ही एकंदरीतच जागतिक समस्या बनली आहे. पुरुषच नव्हे तर महिलांमधील लठ्ठपणा, वाढते वजन हे आरोग्याच्या नव्या समस्यांना आमंत्रण देत आहे. त्यामुळे सडपातळ बनण्यासाठी आज बहुतांश तरुणी–स्त्रिया विविध उपाय करताना दिसतात. त्यामध्ये कोणत्या गोष्टींचे पालन करावे याविषयी...**



सुंदर व सडपातळ शरीरयष्टी कुणाचेही लक्ष वेधून घेते. नाजुक कंबर व सपाट पोटासाठी महिलावर्गात तर शर्थीचे प्रयत्न सुरु असतात. केवळ तरुणाईच नाही तर वय झालेल्यांनाही शरीरयष्टी सुंदर व आकर्षक करण्याचे वेड लागले असते.

• पण लवकरात लवकर स्लिम बनण्याच्या स्वप्नामुळे खिशाला कशी चाट बसते याचा अंदाजदेखील आपल्याला येत नाही.

• मुळात या सगळ्यासाठी आधी जिभेवर ताबा हवा. अन्न जसे आपल्याला पोषक असते व तसे घातक ही ठरु शकते.

• चटपटीत पदार्थ खाताना आपला मनावरील ताबा सुटतो व जिभेचे लाड पुरवण्यासाठी आपण आपोआप त्या पदार्थांकडे ओढले जातो. त्याचा शरीरावर विपरीत परिणाम होऊन ते बेडौल होते.

आपण जे जगतो ते केवळ खाण्यासाठीच तर आहे, असे काहींचे या समर्थनार्थ म्हणणे असते. त्यामुळे त्यांना खाण्याची जेथे संधी मिळते ती ते साधून घेतात. या प्रकारात महिलाही अग्रेसर आहेत.

• आपल्या खाण्यावर आपण स्वत: मर्यादा नाही घातली तर दर महिन्याला अर्धा पौंड वजन वाढते. महिलांचे वजन हे प्रसूतीनंतरच्या काळात वाढते. यावेळी वजनावर नियंत्रण मिळविले तर शरीरावर होणाऱ्या विपरित परिणामांपासून आपण आपली सुटका करुन घेऊ शकतो.

• एका सर्वेक्षणात असे आढळले की, ५० महिलांच्या मागे एक महिला तिच्या शरीरयष्टीबद्दल समाधानी आहे. ५० टक्के महिला त्यांचे वजन कमी सांगतात तर ६० टक्के महिला या त्यांच्या कपड्यांवरील साईजचे लेबलदेखील काढून टाकतात. प्रत्येक जाड महिला सडपातळ होण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न करताना दिसते. चुकीचा व्यायाम व डायटिंग आपल्या आरोग्यास हानिकारक ठरु शकते. त्यामुळे व्यायाम सुरु करण्याअगोदर फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**वजन कमी करण्याचे उपाय**

• आहार तज्ज्ञाकडून डाएट चार्ट तयार करुन घ्या.
• जेवण निर्धारित वेळेवर घ्या.
• जेवण केल्यानंतर तीन तासांच्या काळात काहीच खाऊ नका.
• रोज सकाळी उठून व्यायाम करा.
• आपले काम स्वत: करण्याची सवय लावा.
• बाजारातील पदार्थ म्हणजे फास्टफूड, तळलेले, लोणी आणि तूपयुक्त पदार्थ खाणे टाळा.
• एका महिन्यात एकदा तरी वजन करुन पहा.
• सॅलड व फळांच्या ज्यूसचे जास्तीत जास्त सेवन करावे.

# भंडारा कोसाची नजाकत



भारतीय पेहरावामध्ये साडी खूप महत्व दिले गेले आहे. साडीमध्ये स्त्रीचे सौंदर्य अधिकच खुलून दिसते. पाश्चात्या देशातील स्त्रियांनाही भारतात आल्यानंतर साडी नेसण्याचा मोह आवरता येत नाही, इतके साडीने महत्व जपले आहे. अगदी अलीकडेच कान्स महोत्सवातही आपल्या बॉलीवूडच्या अभिनेत्रींनी साडी परिधान करुनच भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले.

अशी ही सर्वांच्या मनात ठाण मांडून बसलेली साडी विविध प्रकारामध्ये आढळून येते. त्यामध्ये भंडारा कोसा साडी ही एक रिच आणि एक्झिक्युटिव्ह लुक देऊन जाते.

भंडारा येथे तयार होणारी रेशीम भंडारा कोसा साडी म्हणून सुपरिचित आहे. तसेच पर्यावरणाला साजेशी साडी म्हणून या साडीकडे पाहिले जाते. कोसा हा रेशमचा एक प्रकार. भंडाऱ्यातील जंगलात कोसा पद्धतीचे कोष मोठ्या प्रमाणावर नैसर्गिकरित्या दिसतात. त्या कोषापासून धागे तयार केले जातात. या धाग्यांना नैसर्गिक रिच लुक असतो. त्यातून साडी तयार केली जाते, म्हणजेच विणली जाते. या साडीचे विणकाम हे अत्याधुनिक अशा विणकर मशिनद्वारे होत असल्याने साडीचा पोत अधिकच चांगला होतो.

भंडारा सिल्क साडी ही सौंदर्य खुलवणारी साडी आहे. या साडीचा लुक रिच असतो. एकाचवेळी पाश्चात्य आणि पारंपरिकता जपण्याचा प्रकार ही साडे घातल्याने होतो. भंडारा सिल्क साडीचे वैशिष्ट्य म्हणजे या साडीचे रंग नैसर्गिक स्वरुपाचे असतात. त्यामुळे परिधान करणाऱ्या स्त्रीचे सौंदर्य अधिक उठावदार दिसते. साडीवर ब्लाऊज हवा त्या पद्धतीचे शिवून घातल्यास या साडीमुळे व्यक्तिमत्वाची वेगळीच ओळख निर्माण होते.

या साडीचे वैशिष्ट्य म्हणजे रिचनेस आणि स्ट्रक्चर यांचा अनोखा संगम होय. या कापडाचे ड्रेसदेखील उत्तम होतात. त्यातून नवनव्या फॅशनद्वारे जीन्सवर टॉप म्हणून कुर्ता अगर शॉर्ट घालता येऊ शकते. विशेषत: महाविद्यालयात जाणाऱ्या असंख्य तरुणी या कपड्याचा झब्बा घालताना दिसतात. अशी ही कोसा साडी सर्वत्र प्रिय असल्याचे दिसून येते.

# आईलाही हवी थोडीशी नियमावली



प्रत्येकाला आपले मूल लाडकेच वाटत असते. या भावनेपोटी प्रत्येकजण लाड करत असताना त्याचे प्रमाण जरा जास्तच होतात, याची जाणीवच राहात नाही. त्यासाठी थोडीशी नियमावली जर स्वत:लाच लावून घेतली तर मुले पालनपोषण उत्तमरितीने घडेल.

• मुलांना स्वत:ची कामे करण्याची शिस्त लावणे महत्वाचे आहे. काही महिला मुलांना अतिलाडामुळे कामे करु देत नाहीत. त्यामुळे मुले आळशी होतात किंवा आई किंवा इतरांवर अवलंबून राहतात.

• मुलांचे लाड करण्यासोबत त्यांना संस्कार व नैतिकतेचे पाठही आईने शिकवले पाहिजे. मुलगा स्वावलंबी बनावा यासाठी खालील महत्वपूर्ण गोष्टींकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे.

• मुलांची कामे तुम्ही न करता त्यांना स्वत:ची कामे स्वत:च करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

• मुलांमध्ये उत्साह निर्माण होईल, असे वातावरण निर्माण करावे.

• मुलांसमोर सकारात्मक बोलले पाहिजे. वारंवार नकारात्मक गोष्टी मुलांसमोर बोलल्याने त्यांची मानसिकताही नकारात्मक होऊन जाते.

• मुलांमध्ये एखादी बदल्याची भावना निर्माण होऊ नये, याची काळजी घेणे किंवा त्याच्यासमोर तशा गप्पा न मारणे योग्य.

• मुलांना प्रेम, मैत्री, सद्भावना, देशप्रेम यांचे महत्व सांगितले पाहिजे.

• मुलांना त्यांचा गृहपाठ स्वत:ला करु द्यावा.

• मुलाची प्रत्येक मागणी पूर्ण करण्यापेक्षा त्याला खऱ्या अर्थाने कोणत्या गोष्टीची गरज आहे, हे प्रथम ओळखले पाहिजे. आणि ही गरज फक्त आईच जवळची असल्याने ओळखू शकते.

• मुलांना लहानपणापासून बचतीची सवय लावली पाहिजे किंवा महत्व सांगितले पाहिजे.

• कुटुंबातील संस्कार हे मुलांना त्यांच्या आईवडिलांकडूनच मिळतात. त्यामुळे मोठ्यांचा आदर राखणे, नमस्कार करणे, नम्र बोलणे आदी सवयी लहानपणापासूनच लावल्या पाहिजे.

## घुसखोरांना मदत करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

# रोहिंग्यांविरोधात कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** बांगलादेशी घुसखोरांना दिल्लीत राहण्यासाठी मदत करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला. बनावट ओळखपत्र आणि इतर कागदपत्रे बनवल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी ११ जणांना अटक केली आहे. अटक केलेल्यांपैकी ५ बांगलादेशी आणि ६ स्थानिक लोक आहेत. हे लोक मतदान कार्ड, आधार कार्ड यांसारख्या बनावट कागदपत्रांद्वारे बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांना दिल्लीत राहण्यास मदत करायचे, असे पोलिसांनी सांगितले.

दक्षिण दिल्लीचे पोलिस उपायुक्त अंकित चौहान म्हणाले की, अटक केलेल्यांकडून बनावट आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट जप्त करण्यात आले आहेत. हे लोक बनावट संकेतस्थळाच्या माध्यमातून बनावट कागदपत्रे तयार करायचे. संकेतस्थळ रजत मिश्रा चालवत होता. अटक करण्यात आलेल्यांमध्ये एका महिलेचाही समावेश आहे, जिने बनावट आधार वापरून मतदार कार्ड बनवले होते. अवैध स्थलांतरितांनी भारतीय हद्दीत प्रवेश करण्यासाठी जंगल मार्ग आणि एक्स्प्रेस गाड्यांचा वापर केला असल्याचा अंदाज चौहान यांनी व्यक्त केला.

दिल्ली महानगरपालिकेने (एमसीडी) बेकायदेशीर बांगलादेशींच्या संदर्भात २१ डिसेंबर रोजी शिक्षण आणि आरोग्य विभागाला नोटीस पाठवली होती. शिक्षण विभागाला बेकायदेशीर बांगलादेशी विद्यार्थ्यांची ओळख पटवून त्यांना पालिका शाळांमध्ये प्रवेश घेण्यापासून रोखण्यासाठी पावले उचलण्याचे निर्देश दिले होते. आरोग्य विभागाला पाठवलेल्या नोटीसमध्ये बेकायदेशीर बांगलादेशींचे जन्म प्रमाणपत्र बनवू नये असे आदेश देण्यात आले आहेत. ज्या बांगलादेशींची जन्म प्रमाणपत्रे आधीच जारी केली गेली आहेत, त्यांची ओळख पटवण्यासाठीही पडताळणी मोहीम राबवावी, असे एमसीडीने सांगितले आहे. बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांचे अतिक्रमण तातडीने हटवण्याचे आदेशही एमसीडीने दिले आहेत. सर्व संबंधित विभागांना ३१ डिसेंबरपर्यंत कार्यवाही अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

### स्थलांतरितांची ओळख पटवण्याची कारवाई

● दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी मुख्य सचिव आणि पोलिस आयुक्तांना बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशी स्थलांतरितांची ओळख पटवण्यासाठी आणि कठोर कारवाई करण्यासाठी दोन महिन्यांची विशेष मोहीम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार ११ डिसेंबरपासून ही मोहीम राबवली जात असून पोलीस कारवाईमध्ये घरोघरी जाऊन पडताळणी, कागदपत्रांची तपासणी आणि चौकशी केली जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत शहरात १ हजारहून अधिक अवैध बांगलादेशी स्थलांतरितांची ओळख पटली आहे.

## इन्फोग्राफिक्स

# तीन दिवस बँकांचे कामकाज बंद

### रिझर्व्ह बँकेचे आवाहन




**मुंबई :** महाराष्ट्रात तीन दिवस बँकांचे कामकाज बंद राहणार आहे. ग्राहकांनी या सुट्या लक्षात ठेवून बँकेशी संबंधित कामांचे नियोजन करावे, असे आवाहन रिझर्व्ह बँकेने केले आहे.आज मंगळवार २४ डिसेंबर असून, पुढल्या आठवड्यात मंगळवारी ३१ डिसेंबर रोजी वर्ष संपणार आहे. या कालावधीत महाराष्ट्रात तीन दिवस बँकांचे कामकाज बंद असेल. राज्यात बुधवार २५ डिसेंबर रोजी नाताळ अर्थात ख्रिसमस निमित्त बँकांचे कामकाज बंद राहणार आहे. यानंतर २८ डिसेंबर रोजी चौथा शनिवार म्हणून नियमानुसार बँकांचे कामकाज बंद असेल. नंतर २९ डिसेंबर रोजी रविवार म्हणून नियमानुसार बँकांचे कामकाज बंद असेल. यामुळे वर्ष संपण्याच्या सुमारास राज्यात बँकांचे कामकाज बुधवार २५ डिसेंबर, शनिवार २८ डिसेंबर आणि रविवार २९ डिसेंबर असे तीन दिवस बंद राहणार आहे. बँकांचे कामकाज बंद राहणार असले तरी एटीएम सेवा, नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग सुरू राहणार आहे. यामुळे बँकेत न जाता दैनंदिन आर्थिक व्यवहार करणाऱ्या कोट्यवधी बँक ग्राहकांचे काम विना अडथळा सुरू राहणार आहे.

**बँकांचे कामकाज 'या' दिवशी बंद राहणार**

- बुधवार २५ डिसेंबर २०२४ - नाताळ अर्थात ख्रिसमस निमित्त सुटी
- शनिवार २८ डिसेंबर २०२४ - चौथा शनिवार, सुटी
- रविवार २९ डिसेंबर २०२४ - रविवारची सुटी


## » Selected

### एस. जयशंकर अमेरिका दौऱ्यावर



**नवी दिल्ली :** भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर २९ डिसेंबर पर्यंत अमेरिका दौऱ्यावर असतील. या दौऱ्यात दोन्ही राष्ट्रांमध्ये द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. केंद्रीय मंत्री जयशंकर यांच्या अमेरिका दौऱ्याची परराष्ट्र मंत्रालयाने निवेदन जारी करुन माहिती दिली. एका निवेदनात परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, परराष्ट्रमंत्री महत्त्वाच्या द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी अमेरिकेला भेट देतील. या भेटीदरम्यान, अमेरिकेतील भारताच्या कौन्सुल जनरल्सच्या परिषदेचे अध्यक्षस्थान देखील ते भूषणवणार आहेत. यापूर्वी १९ डिसेंबर रोजी, भारतातील अमेरिकेचे राजदूत एरिक गार्सेट्टी यांनी दोन्ही देशांच्या भागीदारीच्या संभाव्यतेवर प्रकाश टाकला. दोन्ही देशांमधील व्यापार वाढवण्यावर भर दिला जाणार असल्याचे गार्सेट्टी यांनी सांगितले. या दरम्यान, परराष्ट्र मंत्र्यांचा अमेरिका दौरा हा महत्वाचा मानला जात आहे.

### तुर्कीत शस्त्रास्त्र कारखान्यात स्फोट



**तुर्की :** तुर्कीतील शस्त्रास्त्र कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात १२ जण ठार झाले आहेत. वायव्य तुर्कस्तानमध्ये असलेल्या कारखान्यात मंगळवारी सकाळी ही दुर्घटना झाली आहे. चार जण गंभीर जखमी झाले असून, स्फोटाची तीव्रता लक्षात घेता मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तुर्कीतील बालिकेसिर प्रांतात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी युद्धसामग्री आणि स्फोटके बनवणारी झेडएसआर ॲम्युनिशन प्रोडक्शन फॅक्टरी आहे. अपघाताची तीव्रता लक्षात घेता मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. स्फोटानंतर कारखान्याची इमारत कोसळली, तपास यंत्रणांकडून अपघाताच्या कारणांचा शोध घेतला जात आहे. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## नारायण राणे यांच्या वक्तव्याला महत्त्व

# ...तर नाणार प्रकल्प होईल!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**रत्नागिरी :** रत्नागिरी इथे नारायण राणे यांची सोमवारी पत्रकार परिषद झाली त्यावेळी त्यांनी कोकणातील रिफायनरी प्रकल्पाबाबत वक्तव्य केलं आहे. कंपन्या तयार असतील तर नाणार प्रकल्प होणार, अशी प्रतिक्रिया माजी केंद्रीय मंत्री आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे खासदार नारायण राणे यांनी दिली आहे. त्यामुळे महायुतीतील घटक पक्षांमध्ये कोकणातल्या रिफायनरीच्या मुद्द्यावरून परस्पर विरोधी मते असल्याचे दिसून येते.

कोकणातील रिफायनरी प्रकल्प राज्याबाहेर गेला अशी चर्चा सुरू असताना नारायण राणे यांचे हे विधान खूप महत्त्वाचे आहे. शिवाय नारायण राणे यांनी बारसु रिफायनरी ऐवजी नाणारचा उल्लेख केल्यामुळे याला आणखी महत्व प्राप्त झालं आहे. कारण राज्यातील सरकार आल्यानंतर कोकणातले भाजपा नेते हे पुन्हा एकदा सक्रिय झाले आहे. नाणार रिफायनरी समर्थक देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे नारायण राणे यांचं विधान अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे.

नाणार येथील रिफायनरीसाठीचे जमीन अधिग्रहण २०१९ मध्ये रद्द केले गेले. त्यानंतर बारसूचा विषय चर्चेत आला. पण, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी आणि निवडणुकीच्या निकालानंतर देखील बार्शी येथे रिफायनरी होणार नाही, अशी भूमिका एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने घेतली आहे. तर जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला असलेला विरोध मोडून काढण्यामध्ये नारायण राणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे नारायण राणे यांच्या मनात नेमकं काय सुरू आहे? भाजपा नाणार रिफायनरीसाठी प्रयत्नशील तर नाही ना? असे प्रश्न यातून उपस्थित होतात.

## श्याम बेनेगल अनंतात विलीन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** चित्रपटसृष्टीतील दिग्गज दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्यावर मुंबईत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बॉलीवूडमधील अनेक दिग्गज कलाकार बेनेगल यांना शेवटचा निरोप देण्यासाठी उपस्थित होते. मुंबई पोलिसांनी तिरंग्यामध्ये लपेटलेला त्यांचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी सन्मानाने नेला. मुंबई पोलिसांच्या बँड पथकाद्वारे यावेळी शोकधून वाजवण्यात आली. बंदुकीच्या तीन फैरी झाडून बेनेगल यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारापूर्वी बेनेगल यांचं पार्थिव दादर शिवाजी पार्क येथील भागोजी कीर हिंदू स्मशानभूमीमध्ये सुमारे तासभर अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शाह, सचिन खेडेकर, गीतकार गुलजार, इला अरुण, यांच्यासहित इतर कलाकारांनी यावेळी स्मशानभूमीत गर्दी केली होती.

# राणीच्या बागेत अनारकलीची अनुपस्थिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मुंबईत कुठे फिरायला जायचं म्हटलं तर, गेटवे ऑफ इंडिया, कमला नेहरू पार्क, बोरिवली नॅशनल पार्क आणि वीर माता जिजाबाई भोसले वनस्पती आणि प्राणी उद्यान म्हणजेच मुंबईकरांची राणीची बाग असे ठराविक तीन-चार स्पॉट लगेच डोळ्यासमोर येतात. यात राणीची बाग ही मुंबईकरांची आणि बच्चे कंपनीची आवडती जागा. इथे वाघ, बिबटे, पेंग्विन, विविध प्रकारचे परदेशी पक्षी, प्राणी, अस्वल, वनस्पती तुम्हाला पाहायला मिळतात.

वीर माता जिजामाता भोसले उद्यानात १९७७ पासून एक 'अनारकली' नावाची हत्तीण देखील होती. मात्र, वयाच्या ५९ वर्षे या हत्तीणीचं निधन झाल्यानं आता अनारकलीची जागा रिक्त झाली आहे. त्यातच केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या २०१६ च्या नियमाप्रमाणे यापुढे प्राणी संग्रहालयात हत्ती ठेवता येणार नसल्यानं, यापुढे मुंबईकरांना प्राणी संग्रहालयात हत्ती पाहता येणार नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे.

दक्षिण मुंबईतील भायखळा येथील वीर माता जिजामाता भोसले उद्यानात 'अनारकली' हत्तीण ही बच्चे कंपनीचे आकर्षण होती. मात्र, वयाच्या ५९ व्या अनारकलीचं निधन झालं. आता अनारकलीच्या जागेवर नवीन हत्ती येणार नाही. राणीच्या बागेत १९७७ पासून लक्ष्मी आणि अनारकली या दोन हत्तीणी मुलांना पाहता याव्यात म्हणून आणण्यात आल्या होत्या. त्यानंतर एका नर हत्तीला देखील या उद्यानात आणण्यात आलं. मात्र, काही कारणास्तव नर हत्तीला पुन्हा केरळला पाठवण्यात आलं होतं. यातील लक्ष्मीचं चार वर्षांपूर्वी निधन झालं. तर, काही दिवसांपूर्वी अनारकलीचं निधन झालं. अनारकलीच्या पोटात तब्बल दीडशे किलोचा गोळा असल्याचं शवविच्छेदनानंतर स्पष्ट झालं.

## सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रामसुब्रमण्यम एनएचआरसीचे नवे अध्यक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (एनएचआरसी) अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती व्ही. रामसुब्रमण्यम यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीवर काँग्रेसने नाराजी व्यक्त केले आहे. व्ही. रामसुब्रमण्यम यांची निवड आधीच ठरली होती. त्यांच्या नियुक्तीबाबत विरोधी पक्षांचा सल्ला किंवा सहमतीकडे दुर्लक्ष करण्यात आले. मानवाधिकार अध्यक्ष व सदस्य निवडीची प्रक्रियाच सदोष असल्याचे काँग्रेसने म्हटलं आहे.

१ जून २०२४ रोजी निवृत्त न्यायमूर्ती अरुण कुमार मिश्रा यांचा कार्यकाळ पूर्ण झाला. तेव्हापासून 'एनएचआरसी'चे अध्यक्षपद रिक्त होते. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी या पदासाठी न्यायमूर्ती रोहिंटन फली नरीमन आणि न्यायमूर्ती कुट्टीयल मॅथ्यू जोसेफ यांची नावे सुचवली होती. मानवाधिकार आयोग अध्यश्र आणि सदस्यांची निवड करण्यासाठी १८डिसेंबर रोजी संसदेत निवड समितीची बैठक झाली. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश व्ही राम सुब्रमण्यम यांची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे नवे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.

### आम्ही बैठकीत मांडलेल्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष

● लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी समितीची निवड प्रक्रिया चुकीची असल्याचे म्हटले आहे. ही निवड पूर्वनियोजित होती. अशा महत्त्वाच्या पदाबाबत सामूहिक निर्णय घेण्याऐवजी समितीने नावे मंजूर करण्यासाठी संख्यात्मक बहुमतावर अवलंबून राहिली. आम्ही बैठकीत मांडलेल्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे कार्य सर्व नागरिकांच्या आणि विशेषतः समाजातील शोषित आणि उपेक्षित घटकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे आहे, असेही काँग्रेस नेत्यांनी म्हटलं आहे.

## मेरी ख्रिसमस...!

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**कोची :** येथील चर्चमध्ये ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती.

# राज्यातील वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात नवीन सरकार येताच वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांची बदली ही दिव्यांग विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी करण्यात आली आहे. तर हर्षदीप कांबळे यांची बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी बदली करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव राधाकृष्णन यांची महाजेनकोच्या अध्यक्षपदी बदली करण्यात आली आहे. वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिलेंची नाशिक महापालिका आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. राज्यात प्रशासकीय बदलास सुरुवात झाली असून त्याचाच भाग म्हणून या बदल्यांकडे पाहिले जाते.

**कोणत्या अधिकाऱ्यांच्या बदल्या?**

मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव राधाकृष्णन यांची महाजेनकोच्या अध्यक्षपदी बदली.,महाजेनकोचे अध्यक्ष अनबाल्गन यांच्याकडे आता उद्योग विभागाच्या सचिवपदाची जबाबदारी.,गडचिरोलीचे जिल्हाधिकारी संजय दैने यांकडे नागपूर टेक्सटाईल आयुक्तपदाची धुरा.,आयुक्त अविशांत पांडा यांची गडचिरोलीच्या जिल्हाधिकारी पदावर बदली.,वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिलेंची नाशिक महापालिका आयुक्तपदी बदली.,राज्य कर सहआयुक्त सी वनमाथी यांची वर्ध्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती.,सा वनमाथी यांच्या जागी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे सीईओ संजय पवार यांची वर्णी.,विवेक जोन्सन हे चंद्रपूरचे नवे जिल्हा परिषद सीईओ.,पुणे विभागीय महसूल उपायुक्त अण्णासाहेब चव्हाण यांची महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेच्या सीईओपदी बदली केली आहे.

## मद्यधुंद कारचालकाची ९ जणांना धडक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** उल्हासनगर येथील कॅम्प नंबर चारच्या व्हीनस चौकात मंगळवारी पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. एका मद्यधुंद कारचालकानं ९ जणांना धडक दिली. या घटनेत ४ जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी, पहाटे पाचच्या सुमारास हा अपघात झाला. कार चालक व्हीनस चौक परिसरातून कार भरधाव वेगानं घेऊन जात असताना त्यानं रस्त्यावरून जाणाऱ्या रिक्षा आणि काही नागरिकांना जोरदार धडक दिली. कारचालक मद्यधुंद अवस्थेत असल्यानं हा अपघात झाल्याची माहिती अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीनं दिली. यातील दोघांवर खासगी तर इतर दोघांवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात इतका भीषण होता की, कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. या अपघातात कार चालकासह ४ जण गंभीररित्या जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आता याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## काश्मीर फाईटविरोधात आरोपपत्र दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू - कश्मीरमधील राज्य तपास यंत्रणेने (एसआयए) 'काश्मीर फाईट' नावाच्या कुप्रसिद्ध सोशल मीडिया हँडलमागील प्रमुख कार्यकर्त्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे.

प्रतिबंधित दहशतवादी संघटना द रेझिस्टन्स फ्रंटद्वारे (टीआरएफ) चालवल्या जाणाऱ्या या हँडलचा वापर स्थलांतरित काश्मिरी पंडित कर्मचाऱ्यांना भीती आणि अशांतता पसरवण्याच्या उद्देशाने ऑनलाइन धमक्या देण्यासाठी केला गेला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी मध्ये दहशतवादी संघटनांच्या सोशल मीडिया हँडलवरून सोशल मीडियावर अनेक धमकीच्या पोस्ट प्रकाशित करण्यात आल्या होत्या. त्यानंतर एसआयए जम्मूने तपास सुरू केला. तपासादरम्यान, एसआयएने श्रीनगरचा रहिवासी फरहान मुझफ्फर मट्टू याला लक्ष्यित कर्मचाऱ्यांची संवेदनशील माहिती गोळा करण्यात आणि शेअर करण्याच्या कथित भूमिकेसाठी अटक केली आहे. तपासात असे दिसून आले की मट्टूने मध्यस्थ म्हणून काम केले, एनक्रिप्टेड कम्युनिकेशन प्लॅटफॉर्मचा वापर करून स्थलांतरित कामगारांबद्दलचा गंभीर डेटा पाकिस्तानमधील हँडलर्सना पाठवला. ज्यांनी नंतर "काश्मीर फाईट" प्लॅटफॉर्मद्वारे धमक्या दिल्या होत्या.

### जाहीर नोटीस

**उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय**

७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे - ४११००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६१३०८३२ Email - sdopune@gmail.com

क्र. मृत्यु रजि./एसआर/५४/२०२४

१) श्री. चंद्रकांत दगडू मानकर, रा. सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे. अर्जदार

विरुध्द

१) जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे जाबदेणार

२) पंचायत समिती हवेली

विषय : जन्म - मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम २०२३ नुसार

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. चंद्रकांत दगडू मानकर, रा. सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे (अर्जदार) यांनी त्यांचे आई कै. भीमाबाई दगडू मानकर, यांचा मृत्यु दि. ०९/०१/२०१८ रोजी मौजे सांगरुन, ता. हवेली, जि. पुणे येथे झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम ११ (३) प्रमाणे मृत्यु नोंदणीचा करण्याचा आदेश मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाचे कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या कागदपत्रांसह आपले म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. २९/११/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण- पुणे

दिनांक:- २९/११/२०२४

(शिक्का)

(डॉ. यशवंत माने)
उपविभागीय दंडाधिकारी, हवेली
उपविभाग पुणे

## शहरी तसेच तंत्रज्ञान प्रेमींच्या गरजा पूर्ण करणारी गाडी

# कियाची बहुप्रतिक्षित 'किया सिरॉस' एसयूव्ही लाँच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** किया इंडियाने बहुप्रतिक्षित किया सिरॉस लाँच केली आहे. ही क्रांतिकारी एसयूव्ही डिझाइन, तंत्रज्ञान आणि स्पेसमध्ये नवीन मानक स्थापित करण्यास सज्ज आहे. सुधारित के१ प्लॅटफॉर्मवर निर्माण करण्यात आलेली सिरॉस शहरी ड्रायव्हर्स आणि तंत्रज्ञान-प्रेमी ॲडव्हेंचर्सच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. या कारमध्ये वैविध्यतेसह अत्याधुनिक सुधारणांचे उत्तम संयोजन आहे. या मॉडेलमध्ये फर्स्ट-इन-सेगमेंट रिअर स्लाइडिंग, रिक्लायनिंग आणि व्हेंटिलेटेड सीट्ससह इतर विविध सर्वोत्तम वैशिष्ट्ये आहेत, जसे ड्युअल-पेन पॅनोरॅमिक सनरूफ व लेव्हल २ एडीएएससह १६-ऑटोनॉमस सेफ्टी वैशिष्ट्ये, ज्याला पूरक २० रॉबस्ट हाय स्टँडर्ड सेफ्टी पॅकेजचे सर्वसमावेशक सूट आहे.

### आकर्षकता व कार्यक्षम नाविन्यतेचे उत्तम संयोजन

● सिरॉसच्या बाहेरील भागामधून कियाचे 'ऑपोझिट्स युनायटेड' तत्त्व दिसून येते, ज्यामध्ये आकर्षकता व कार्यक्षम वैविध्यतेचे संयोजन आहे. या कारची आकर्षक डिझाइन सर्वांचे लक्ष वेधून घेते, ज्यामध्ये कियाचे सिग्नेचर स्टारमॅप एलईडी लायटिंग आहे, जे सर्वोत्तम व आकर्षक लुकची खात्री देते. विशिष्ट किया सिग्नेचर डिजिटल टायगर फेस रस्त्यावर कारच्या आकर्षकतेमध्ये अधिक भर करते.




"किया इंडियाने नेहमी चॅलेंजर उत्साह राखला आहे, तसेच नाविन्यता, तंत्रज्ञान व ग्राहक-केंद्रित डिझाइनप्रती आमच्या कटिबद्धतेसह ऑटोमोटिव्ह उद्योगामध्ये नवीन बेंचमार्क्स स्थापित करत आहे. पहिल्या लाँचपासून आमचा प्रवास उल्लेखनीय राहिला आहे, जेथे देशभरात उपस्थिती वाढत आहे आणि उच्च दर्जाच्या, महत्त्वाकांक्षी वेईकल्स वितरित करण्यावर फोकस आहे.

— ग्वांगू ली, किया इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी



आपले पहिले लक्ष्य देशासाठी पदक जिंकणे आहे

## मनू भाकर यांनी खेलरत्न प्रकरणावर मौन तोडले

मनू भाकर, खेलरत्न नामांकन: भारताची स्टार नेमबाज आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये 2 पदके जिंकणारी मनू भाकर सध्या चर्चेत आहे. 22 वर्षीय मनू भाकरने खेलरत्न पुरस्काराच्या मुद्द्यावर आपले मौन तोडले आहे. या संपूर्ण प्रकरणावर त्यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे स्पष्टीकरण दिले आहे. काही मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला आहे की मनू भाकरला खेलरत्न पुरस्कारासाठी नामांकन मिळालेले नाही. या संपूर्ण प्रकरणावर मनू भाकरच्या वडिलांनीही एक वक्तव्य दिले होते, ज्याने मीडियामध्ये खूप चर्चेचा विषय बनवला होता. आता खुद्द मनू भाकर यांनीच यावर खुलासा केला आहे. त्याने इंस्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर केली आहे.

आपले पहिले लक्ष्य देशासाठी पदक जिंकणे आहे, कोणताही पुरस्कार नाही. मनूने सांगितले की पुरस्कार ही त्याची प्रेरणा असू शकते, परंतु त्याचे ध्येय नाही.

# 'कोण कुठे खेळणार, काळजी करू नका...

## मेलबर्न कसोटीपूर्वी विराटच्या खराब फॉर्मवर रोहितने केले स्पष्ट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मेलबर्न :** भारतीय कर्णधार रोहित शर्माने त्याच्या गुडघ्याच्या दुखापतीबद्दल व्यक्त केल्या जात असलेल्या शंका फेटाळून लावल्या आहेत. त्याने मंगळवारी सांगितले की तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे, परंतु त्याने फलंदाजी क्रमवारीत आपल्या स्थानाबाबत साशंकता कायम ठेवली.

मेलबर्न क्रिकेट ग्राउंड येथे रविवारी सराव करताना रोहितच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली होती आणि याविषयी अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत. २६ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या चौथ्या कसोटी सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेत रोहित म्हणाला, 'माझा गुडघा ठीक आहे.' त्याचवेळी त्याने कोहलीच्या फॉर्मवरही मत व्यक्त केले.

**बॉक्सिंग डे टेस्ट २०२४**

दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे रोहित पहिल्या कसोटी सामन्यात खेळू शकला नाही. पुढच्या सामन्यात तो सलामीवीर म्हणून परतणार होता, पण केएल राहुलने पर्थमध्ये ७७ धावांची दमदार खेळी करत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली, त्यामुळे भारतीय कर्णधाराला सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करावी लागली.

मात्र, हा बदल रोहितसाठी चांगला ठरला नाही आणि आतापर्यंत त्याने तीन डावात केवळ 19 धावा केल्या आहेत. दुसरीकडे, राहुलने तिसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात 84 धावा करून आघाडीच्या फळीवर आपला दावा मजबूत केला.

भारतीय कर्णधाराने मात्र संघासाठी जे चांगले होईल तेच करणार असल्याचे सांगितले. तो म्हणाला, 'कोण कुठे फलंदाजी करेल याची काळजी करू नका. आपण याबद्दल विचार करणे आवश्यक आहे आणि मी येथे चर्चा करत नाही. संघासाठी जे सर्वोत्तम आहे ते आम्ही करू.

विराट कोहलीचा खराब फॉर्म आणि ऑफ-स्टंपच्या बाहेर जाणारे चेंडू खेळण्यात अडचण याविषयी विचारले असता रोहित म्हणाला की अनुभवी फलंदाज त्यावर मात करण्याचा मार्ग शोधेल.

## पृथ्वी क्रिकेट ॲकॅडमी संघाने सलग दोन विजय



**पुणे :** कमोडोर एल.एस. मेहता यांच्या स्मरणार्थ आयोजित 'गुरू विजय दळवी करंडक' १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ षटकांच्या क्रिकेट २०२४ स्पर्धेत पृथ्वी क्रिकेट ॲकॅडमीने आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत सलग दोन विजयांची नोंद केली.

धानोरी येथील डी.एन.परांडे स्पोर्ट्स हब मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत पहिल्या सामन्यामध्ये विरेन न्यायनीत याने केलेल्या अचुक गोलंदाजीमुळे पृथ्वी ॲकॅडमीने राजस्थान रॉयल्स् ॲकॅडमी पुणे संघाचा ६ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या राजस्थान रॉयल्स् ॲकॅडमी पुणे संघाचा डाव १०३ धावांवर आटोपला. विरेन न्यायनीत याने २२ धावांमध्ये ३ गडी बाद केले. समर्थ मदीखांबे याने २ खेळाडू टिपले. हे लक्ष्य पृथ्वी क्रिकेट ॲकॅडमीने २४ षटकात व ४ गडी गमावून पूर्ण केले. पृथ्वीराज खांडवे याने नाबाद ५४ धावांची खेळी करून संघाला विजयाचा रस्ता दाखवला.

दुसऱ्या सामन्यामध्ये स्वराज मोरे याने केलेल्या गोलंदाजीतील कामगिरीमुळे पृथ्वी ॲकॅडमीने वीरांगण ॲकॅडमीचा ७ गडी राखून पराभव केला.

## हर्लिन देओल चे शानदार शतक




**मुंबई :** वेस्ट इंडिजविरूद्ध दुसऱ्या वन-डे सामन्यातही भारताने प्रथम फलंदाजी करत ३०० पार धावसंख्या उभारली. सुरूवातीपासूनच भारतीय फलंदाज चांगल्या लयमध्ये दिसून आल्या. स्मृती मानधना, प्रतिका रावल व जेमिमाह रॉड्रीग्स यांच्या अर्धशतकांना हर्लिन देओलच्या शतकाची जोड मिळाली आणि भारतीय संघाने वेस्ट इंडिजला विजयासाठी ३५९ धावांचे तगडे लक्ष्य दिले. वन-डेमधील भारताची ही आत्तापर्यंतची संयुक्तपणे सर्वाधिक मोठी धावसंख्या आहे. २०१७ भारतीय संघाने आर्यलँडविरूद्ध २ बाद ३५८ धावा केल्या होत्या. भारताने नाणेफेक जिंकून वडोदराच्या मैदानावर प्रथम फलंदजीचा निर्णय घेतला. सलामीवीर स्मृती मानधनाने नवख्या प्रतिका रावलला साथीला घेत सलग दुसऱ्यांदा शतकी भागीदारी (११०) केली. सगल सहावे अर्धशतक झळकावणारी स्मृती चूकीच्या कॉलमुळे धावबाद झाली. तिने या डावात ७ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ५३ धावा केल्या. त्यानंतर मोर्चा प्रतिका रावल व हर्लिन देओलने सांभाळला. मागच्या सामन्यात प्रतिकाचे अर्धशतक हुकले होते. पण तिने यावेळी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिले अर्धशतक झळकावले. प्रतिकाची खेळी पाहाता ती अर्धशतकाचे शतकात रुपांतर करेल, असे वाटत होते. पण, जैदा जेम्सने तिला सहज बाद केले. प्रतिका ८६ चेंडूंत १० चौकार व १ षटकारासह ७६ धावांवर माघारी परतली. त्यानंतर हर्लिन देओल व हरमनप्रीत कौर भारताचा डाव २०० पार घेऊन गेल्या. ३५ व्या षटकात हरमनप्रीत चुकीच्या शॉट निवडीमुळे बोल्ड झाली. हरमनप्रीत १८ चेंडूत २२ धावांचे योगदान देऊ शकली.




# चॅम्पियन्स ट्रॉफीचे वेळापत्रक जाहीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**मुंबई :** चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं वेळापत्रक अखेर जाहीर झाले आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडे या स्पर्धेचे यजमानपद असले तरी भारताच्या विरोधामुळे ही स्पर्धा हायब्रिड मॉडेलनुसारच होणार आहे. भारताने पाकिस्तान दौऱ्यावर जाण्यास नकार दिल्याने २०२३च्या आशिया चषक स्पर्धेप्रमाणेच चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ हायब्रिड मॉडेलनुसार होणार असल्याचे आयसीसीने जाहीर केले होते. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (ICC) ने आज चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या सामन्यांची घोषणा केली, जी पाकिस्तान आणि UAE मध्ये १९ फेब्रुवारी ते ९मार्च दरम्यान होणार आहे. आयसीसीला पुरुष चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे वेळापत्रक जाहीर करताना आनंद होत आहे. २०१७ नंतर ही स्पर्धा होत आहे, असे आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी म्हटले.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी सांगितले की, चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद हे पाकिस्तानसाठी महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. जे सर्वोच्च स्तरावर क्रिकेटला चालना देण्याच्या आमची वचनबद्धता अधोरेखित करते.

**ICC पुरुष चॅम्पियन्स ट्रॉफी 2025 चे वेळापत्रक**

- १९ फेब्रुवारी – पाकिस्तान विरुद्ध न्यूझीलंड, नॅशनल स्टेडियम, कराची
- २० फेब्रुवारी – बांगलादेश विरुद्ध भारत, दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, दुबई
- २१ फेब्रुवारी – अफगाणिस्तान विरुद्ध दक्षिण आफ्रिका, नॅशनल स्टेडियम, कराची
- २२ फेब्रुवारी – ऑस्ट्रेलिया विरुद्ध इंग्लंड, गद्दाफी स्टेडियम, लाहोर
- २३ फेब्रुवारी – पाकिस्तान विरुद्ध भारत, दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, दुबई
- २४ फेब्रुवारी - बांगलादेश विरुद्ध न्यूझीलंड, रावळपिंडी क्रिकेट स्टेडियम, रावळपिंडी
- २५ फेब्रुवारी – ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका, रावळपिंडी क्रिकेट स्टेडियम, रावळपिंडी
- २६ फेब्रुवारी – अफगाणिस्तान विरुद्ध इंग्लंड, गद्दाफी स्टेडियम, लाहोर
- २७ फेब्रुवारी – पाकिस्तान विरुद्ध बांगलादेश, रावळपिंडी क्रिकेट स्टेडियम, रावळपिंडी
- २८ फेब्रुवारी – अफगाणिस्तान विरुद्ध ऑस्ट्रेलिया, गद्दाफी स्टेडियम, लाहोर
- १ मार्च – दक्षिण आफ्रिका विरुद्ध इंग्लंड, नॅशनल स्टेडियम, कराची
- २ मार्च – न्यूझीलंड विरुद्ध भारत, दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, दुबई
- ४ मार्च – उपांत्य फेरी १, दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, दुबई*
- ५ मार्च – उपांत्य फेरी २, गद्दाफी स्टेडियम, लाहोर**
- ९ मार्च - फायनल - गद्दाफी स्टेडियम, लाहोर**
- उपांत्यपूर्व १ मध्ये भारत पात्र ठरला तर तो सामना दुबईत होईल.
- पाकिस्तान पात्र ठरल्यास उपांत्य फेरी २ सामना लाहोर येथे होईल
- जर भारत अंतिम फेरीसाठी पात्र ठरला तर तो सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, दुबई येथे खेळवला जाईल

## सृष्टी, अव्दिका यांची चमकदार कामगिरी
# एसएआरके क्रिकेट ॲकॅडमी, योगेश क्रिकेट ॲकॅडमी संघ विजयी




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ट्रेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'कोद्रे फार्म्स करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धेत एसएआरके क्रिकेट ॲकॅडमी आणि योगेश क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी नोंदविलेल्या विजयांमध्ये अनुक्रमे सृष्टी भुजबळ आणि अव्दिका जाधव यांनी चमकदार कामगिरी करून संघाला विजय मिळवून दिला.

सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत विदीथ रायकर याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे कोद्रे फार्म्स क्रिकेट ॲकॅडमीने एमबीबी ॲकॅडमीचा केवळ एका धावेनी विजय मिळवला. पहिल्यांदा खेळणाऱ्या कोद्रे संघाने १२९ धावा धावफलकावर लावल्या होत्या. एमबीबी ॲकॅडमीचा डाव १२८ धावांवर मर्यादित राहीला. रोनित चौहान, विवान दांगट आणि विदीथ रायकर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाला विजय मिळवून दिला. सृष्टी भुजबळ हिने केलेल्या भेदक गोलंदाजीमुळे एसएआरके क्रिकेट ॲकॅडमीने २२ यार्ड्स ॲकॅडमीचा १५२ धावांनी सहज धुव्वा उडविला.

## सीसीए अचिव्हर्स व विराग अकादमी यांच्यात लढत



**पुणे :** बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक 12 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीत विहान सुतार 42 व 2-34) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर विराग क्रिकेट अकादमी संघाने कडूस क्रिकेट अकादमी संघाचा 23 धावांनी पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

दापोडी येथील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत प्रथम फलंदाजी करताना विराग क्रिकेट अकादमी संघाने 25षटकात 9बाद 152धावा केल्या. यात विहान सुतार 42, प्रिन्स कलाटे 37 यांनी धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. कडूस क्रिकेट अकादमीकडून विहान बेरड(2-31), दिग्विजय खेडकर(2-33)यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. याच्या उत्तरात कडूस क्रिकेट अकादमी संघ 23.2षटकात सर्वबाद 129धावावर संपुष्टात आला. यात अर्णव नैकरेने एकाबाजूने लढताना 41 धावा केल्या. विराग क्रिकेट अकादमी संघाकडून श्रेयांश शर्मा(3-19), शाश्वत सिंग(3-25), विहान सुतार(2-34) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला 23 धावांनी विजय मिळवून दिला.

**व्हॉलीबॉल अजिंक्यपद**

## खुली राज्य निवड चाचणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या तदर्थ समितीद्वारा जयपूर राजस्थान येथे होणाऱ्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी राज्य संघाची निवड करण्यासाठी खुल्या राज्य व्हॉलीबॉल निवड चाचणीचे आयोजन गुरुवार 26 डिसेंबर रोजी सकाळी 8 वाजता चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, गुलटेकडी येथे करण्यात येणार आहे.

जयपूर राजस्थान या ठिकाणी 7 ते 13 जानेवारी 2025 या कालावधीत सन 2025 मधील वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

## क्रिककिंगडम चॅम्पियन्स करंडक
# डीपीएस डायनामोज, सिंगापूर थंडरबोल्ट संघांची विजयी सलामी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** क्रिककिंगडम यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या क्रिककिंगडम चॅम्पियन्स करंडक 16 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत डीपीएस डायनामोज, सिंगापूर थंडरबोल्ट या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

शापूर्जी पालोनजी मैदान व वीरांगना क्रिकेट मैदान या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत सलामीच्या लढतीत अजित सिंग(4-9)याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर डीपीएस डायनामोज संघाने ओडीएम ब्लास्टर्स भुवनेश्वर संघाचा 5 गडी राखून पराभव करत शानदार सुरुवात केली.

दुसऱ्या सामन्यात रेवांत सहाय(नाबाद 35 व 1-6) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर सिंगापूर थंडरबोल्ट संघाने ओडीएम ग्लॅडिएटर्स रांची संघाचा 89 धावांनी पराभव करून विजयी सुरुवात केली. याआधी स्पर्धेचे उद्घाटन भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माचा लहान भाऊ विशाल शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले.

## सिनियर पेअर्स गटात मिलिंद आठवले व पी श्रीधर विजयी

**पुणे :** पूना रिजन ब्रिज संघटना यांच्या वतीने आयोजित व ब्रिज फेडरेशन ऑफ इंडिया (बीएफआय), महाराष्ट्र ब्रिज संघटना (एमबीए) यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या अशोक रुईया मेमोरियल हिवाळी राष्ट्रीय ब्रिज स्पर्धेत मॉल ऑफ द मिलेनियम मॅच पॉइंट पेअर्स या सर्वाधिक प्रतिष्ठीत स्पर्धेत मुंबईच्या जितेंद्र सोलानी व राजेश दलाल यांनी विजेतेपद संपादन केले. तर, सिनियर पेअर्स गटात मिलिंद आठवले व पी श्रीधर या जोडीने विजेतेपद पटकावले.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेतील मॉल ऑफ द मिलेनियम मॅच पॉइंट पेअर्स गटात सोलानी व दलाल यांनी सर्वाधिक 743.85 गुणांची कमाई करताना सहज प्रथम क्रमांक पटकावला. काजल दास व स्वपनकुमार घोष या जोडीने 682.79 गुण मिळवताना दुसरा क्रमांक मिळवला. तर, संदीप दत्ता व देबब्रत मुजुमदार ही जोडी 669.37 गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर राहिली.

अशोक रुईया सिनियर पेअर्स गटात मिलिंद आठवले व पी श्रीधर या जोडीने 82 गुणांची कमाई करताना अव्वल क्रमांक पटकावला. तर, याच गटात नरेंद्र शिंदे व सुहास विचारे या जोडीने 58 गुणांसह दुसरा, तपन भट्टाचार्य व इंद्र नाथ चटर्जी या जोडीने 55 गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला. स्पर्धेतील विजेत्यांना करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. ८ तारखेपासून चाललेली ही राष्ट्रीय स्पर्धा आज संपन्न झाली.

## जेकेज एक्सलंस चेस अकादमी एकदिवसीय रॅपिड बुद्धीबळ फिडे, एआयसीएफ, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना
# रॅपिड बुद्धीबळ स्पर्धेत अहमदनगरच्या सुयोग वाघ याला विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जेकेज एक्सलंस चेस अकादमी यांच्या वतीने आयोजित, फिडे, एआयसीएफ, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना(एमसीए) व पुणे जिल्हा बुद्धीबळ सर्कल (पीडीसीसी)यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या आणि चेसलव्हर ग्रुप यांच्या सहकार्याने दुसऱ्या जेकेज एक्सलंस चेस अकादमी एकदिवसीय रॅपिड बुद्धीबळ स्पर्धेत अहमदनगरच्या सुयोग वाघ याने 8.5गुणांसह अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले. याआधी स्पर्धेचे उद्घाटन एरोटेक ग्रुपचे संस्थापक किरण कुलकर्णी, कोटीभास्कर इन्फ्राचे संचालक चिदंबर कोटीभास्कर, अभिरुचीचे मालक यशोधन भिडे, एमसीएचे प्रवीण ठाकरे आणि राजेंद्र कोंडे यांच्या हस्ते करण्यात होते.

सिंहगड रोड येथील गुलमोहर बँकवेट्स हॉल, अभिरुची मॉल या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत नवव्या फेरीत दुसऱ्या पटावरील लढतीत सुयोग वाघने संकल्प गुप्ताचा पराभव करून 8.5गुण व 58.5 बुकोल्स कट गुणसरासरीच्या जोरावर विजेतेपद पटकावले. सुयोग याने निमझो इंडीयन पद्धतीने दावास सुरुवात



केली व 35चालीमध्ये मात करत विजय मिळवला. पहिल्या पटावरील लढतीत पश्चिम बंगालच्या मित्रभा गुहाने आपला राज्य सहकारी अर्घ्यदीप दासचा पराभव करून 8.5 गुणांसह दुसरा क्रमांक पटकावला. एल आयसीच्या श्रीराम झा याने तामिळनाडूच्या रामनाथन बालसुब्रमणियमचा पराभव करून 8 गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला. स्पर्धेला चितळे ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे गिरीश चितळे, कोटीभास्कर इन्फ्राचे चिदंबर कोटीभास्कर यांचे मुख्य प्रायोजकत्व, तर एरोटेकचे किरण कुलकर्णी, संदीप काटे यांचे सह प्रायोजकत्व लाभले होते.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूला करंडक व 1लाख रुपये, उपविजेत्या खेळाडूला करंडक व 50हजार रुपये आणि तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूला करंडक व 25हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण एमसीएचे मानद सचिव निरंजन गोडबोले, एमसीएचे सह सचिव व एआयसीएफ इव्हेंटसच्या समितीचे सदस्य अंकुश रक्ताडे, कुंटे चेस अकादमीच्या संचालिका मृणालिनी कुंटे- औरंगाबादकर, कोटीभास्कर इन्फ्राचे चिदंबर कोटीभास्कर जयंत गोखले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालिका आयए एफआय जुईली कुलकर्णी, चीफ आरबीटर आयए राजेंद्र शिदोरे , डेप्युटी चीफ आरबीटरआयए अथर्व गोडबोले आदी मान्यवर उपस्थित होते.